



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६४ वे * अंक १७७ * नांदेड * गुरुवार, दि. ३ जुलै २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211

# हिमाचलमध्ये पावसाचा हाहाकार सुरुच, आभाळ फाटल्याने शेकडो घरे गेली वाहून

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** सोमवारी रात्री हिमाचल प्रदेशातील मंडी येथे ढगफुटीच्या १० घटना घडल्या. त्यामुळे आलेल्या पुरामुळे १६ जण बेपत्ता झाले. आतापर्यंत ५ मृतदेह बाहेर काढण्यात आले. ११ जणांचा शोध सुरू आहे. मंडीच्या कथुनागमध्ये अनेक घरे पुरात वाहून गेली आहेत. मंडीतील कारसोग, धरमपूर, बागशायद, थुनाग, गोहर परिसरातील १०० हून अधिक गावे वीज नसल्याने २४ तासांहून अधिक काळ काळवंडली आहेत.



उत्तर प्रदेशातील वाराणसी येथे गंगेच्या पाण्याची पातळी ताशी ५० मिमी वेगाने वाढत आहे. २४ तासांत पाण्याची पातळी २ मीटरने वाढली आहे. पाणी मणिकर्णिका घाटावर पोहोचले आहे, ज्यामुळे गंगा द्वारचा घाटाशी असलेला संपर्क तुटला आहे. लखीमपूरमध्ये शारदा नदी पूरग्रस्त आहे.

हिमाचलमध्ये ढगफुटीच्या ११ घटना घडल्या, तर अचानक आलेल्या पुराच्या चार घटना आणि भूस्खलनाची एक घटना घडली. बहुतेक घटना मंडी जिल्ह्यात घडल्या, ज्यामुळे सामान्य जनजीवन विस्कळीत झाले. मंडीमध्ये २५३.८ मिमी पाऊस पडला. हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट जारी केला आहे, बुधवारी कांगडा, सोलन आणि सिरमौर या तीन जिल्ह्यांमध्ये आणि शनिवारी उना, हमीरपूर, कांगडा आणि मंडी या चार जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज वर्तविण्यात आला होता. राज्य आपत्कालीन ऑपरेशन सेंटर (एसईओसी) नुसार, पावसामुळे राज्यात एकूण ४०६ रस्ते बंद आहेत, त्यापैकी २४८ एकट्या मंडी जिल्ह्यात आहेत. मंडीमध्ये ९९४ ट्रान्सफॉर्मर देखील बाधित झाले आहेत. अधिकाऱ्यांनी सांगितले की २४ घरे, १२ जनावरांचे गोठे, एक पूल आणि अनेक रस्ते खराब झाले आहेत, ३० गुरे मृत्युमुखी पडली आहेत आणि मंडी जिल्ह्यात अडकलेल्या नऊ लोकांना वाचवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

एसईओसीने सांगितले की, एकूण ३३२ जणांना वाचवण्यात आले आहे, ज्यामध्ये मंडीमध्ये २७८, हमीरपूरमध्ये ५१ आणि चंबामध्ये तीन जणांचा समावेश आहे. गोहरमध्ये चार ठिकाणी, कारसोगमध्ये तीन ठिकाणी, धरमपूरमध्ये दोन ठिकाणी आणि मंडी जिल्ह्यातील थुनागमध्ये एका ठिकाणी ढगफुटीच्या घटना घडल्या.

## नांदेड जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता



**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र मुंबई यांनी दि. ०२ जुलै २०२५ रोजी दुपारी १२:३१ वाजता दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दि. ६ जुलै २०२५ या दिवशी येलो अलर्ट जारी केलेला आहे. दि. ६ जुलै २०२५ ह्या दिवशी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## अंमलीपदार्थ तस्करीसंदर्भात 'मकोका' अंतर्गत कारवाई करण्यासाठी कायद्यात सुधारणा –मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई (प्रतिनिधी)–** 'एनडीपीएस'अंतर्गत अटक झालेल्या आरोपींना जामीन मिळाल्यानंतर त्यांनी पुन्हा गुन्हे केल्याचे सिद्ध झाल्यास आता संघटित गुन्हेगारीअंतर्गत त्यांच्यावर 'मकोका' अंतर्गत कारवाई करण्यासाठी कायद्यात सुधारणा या अधिवेशनातच केली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

विधान परिषद सदस्य डॉ.परिणय फुके, एकनाथ खडसे यांनी ड्रग तस्करी संदर्भात प्रश्न विचारला होता, त्यास मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, राज्यात प्रत्येक पोलीस ठाण्यात स्वतंत्र एनडीपीएस युनिट स्थापन करण्यात आले असून त्यात अधिकारी व अंमलदारांची नियुक्तीही केली आहे. जिल्हा स्तरावर समन्वय समित्याही स्थापन करण्यात आल्या आहे. यात गेल्या दोन–अडीच वर्षांत मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात आली आहे, असेही ते म्हणाले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, केंद्र सरकारच्या मदतीने आता राज्यस्तरीय आणि आंतरराज्यीय समन्वय अधिक प्रभावी झाला आहे. सर्व राज्यांमध्ये 'इंटेलिजन्स' शेअरिंग सुरू असून त्यामुळे तस्करांवर एकत्रितपणे कारवाई शक्य झाली असल्याचेही त्यांनी सांगितले.

व्यसनमुक्तीसाठीची केंद्रे महत्त्वाची असून सध्या त्यांची संख्या आणि गुणवत्ता वाढविण्यासाठी योग्य धोरण तयार करून दर्जेदार व्यसनमुक्ती केंद्रांची उभारणी केली जाणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

### पोलिसांच्या अनुकंपा नियुक्त्यांचा निर्णय मिशन मोडवर राबविला जाणार

राज्य शासनाच्या १५० दिवस आराखडा कार्यक्रमात पोलिसांच्या अनुकंपा भरती संदर्भातील सर्व प्रकरणे मिशन मोडवर निकाली काढली जातील. त्याचबरोबर अनुकंपा भरतीसंदर्भात सर्व विभागांना आदेश देण्यात आले आहेत, अशी माहितीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

## धनुष्यबाण कोणाचा? १६ जुलैला 'सुप्रीम' सुनावणी

**मुंबई (प्रतिनिधी)–** शिवसेनेच्या चिन्हासाठी ठाकरे गटानं पुन्हा एकदा सुप्रीम कोर्टात धाव घेतली आहे. ठाकरे गटाकडून आज पुन्हा एकदा हे प्रकरण सुप्रीम कोर्टात मेन्शन करण्यात आलं आहे. गेल्या दोन वर्षांपासून प्रकरण प्रलंबित आहे. प्रकरण लवकर बोर्डावर घ्या अशी मागणी आता ठाकरे गटाकडून सुप्रीम कोर्टात करण्यात आली आहे. या प्रकरणावर आता येत्या १६ जुलै रोजी सुनावणी होणार आहे.

धनुष्यबाण कोणाचा यावर येत्या १६ जुलैला सुनावणी होणार आहे, ठाकरेंच्या वकिलांनी स्थानिक निवडणुकांचा हवाला देत चिन्हावर सुनावणीची मागणी केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढील आठवड्यात घोषित होण्याची शक्यता आहे, असा युक्तिवाद ठाकरेंच्या वकिलांनी केला आहे. मात्र दुसरीकडे तातडीच्या सुनावणीला शिवसेना शिंदे गटाकडून विरोध करण्यात आला आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुका झाल्याचा मुद्दा शिवसेना शिंदे गटाकडून उपस्थित करण्यात आला आहे.

## बदलीचा आदेश धडकताच वडदकर 'मॅट'मध्ये तर इकडे अंबेकर यांनी घेतला आरडीसीपदाचा पदभार

**नांदेड (प्रतिनिधी)–** कार्यकाळ पूर्ण न होताच अचानक बदली झाल्याचे जिव्हारी लागल्याने निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी 'मॅट'मध्ये धाव घेतली. ते छत्रपती संभाजीनगर येथे पोहोचताच इकडे नव्याने बदली झालेले किरण अंबेकर यांनी निवासी उपजिल्हाधिकारी पदाचा पदभार स्वीकारला आहे.

गेल्या दोन वर्षांपासून महेश वडदकर निवासी उपजिल्हाधिकारी म्हणून नांदेड जिल्ह्यात कार्यरत होते तर पदोन्नतीवर किरण अंबेकर यांची गोंदिया येथे निवडणूक उपजिल्हाधिकारी म्हणून बदली करण्यात




आली. किरण अंबेकर यांनी शासनाकडे नांदेड येथे कुठल्याही रिक्त पदावर बदली करावी, असा अर्ज दाखल केला होता. त्या अनुषंगाने त्यांची बदली नांदेड येथे करण्यात आली. १ जुलै रोजी सायंकाळी उशिरा आदेश प्राप्त झाल्यानंतर किरण अंबेकर यांनी बुधवारी सकाळी तात्काळ एकतर्फी पदभार स्वीकारत कामाला सुरुवात केली. तर यासंदर्भात महेश वडदकर यांनी संभाजीनगर येथील मॅटमध्ये याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर सुनावणी होणार असल्याची खात्रीलायक माहिती सूत्राकडून प्राप्त झाली आहे. अंबेकर व वडदकर या दोघांमध्ये नियुक्तीसंदर्भात कुठलाही वाद नाही. वडकदकरांवर अन्याय झाला असेल तर त्यांनी न्याय मागणे वाजवी आहे. मॅट जो न्याय देईल, तो आपणास मान्य आहे, असे मत किरण अंबेकर यांनी व्यक्त केले.

## उद्धव–राज यांचे विजयी मोर्चासाठी एकत्र निमंत्रण

**मुंबई (प्रतिनिधी)–** त्रिभाषा धोरणाबाबतचा जीआर सरकारने रद्द केल्यावर आता ५ जुलैला ठाकरेंची शिवसेना आणि मनसे विजयी मेळावा साजरा करणार आहेत. वरळी डोम येथे ठाकरेंची शिवसेना आणि मनसे यांचा भव्य एकत्रित मेळावा होणार आहे. या मेळाव्याला शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसेप्रमुख राज ठाकरे उपस्थित राहणार आहेत. ठाकरे बंधूंकडून दुसरं एकत्रित विजयी मेळाव्याचं आवाहन करण्यात आलं आहे. महाराष्ट्रातला प्रत्येक माणूस मराठी बोलताना पाहायलं आहे?, मग ही सुरुवात आहे, असं म्हणत राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंनी सर्वांना दुसरं जाहीर खुलं आमंत्रण दिलं आहे.

विजयी जल्लोष मेळाव्याच्या पार्श्वभूमीवर मनसे आणि शिवसेना ठाकरे गटातील नेत्यांकडून वरळी एनएससीआय डोम येथे पाहणी करण्यासाठी पोहचले आहेत. ठाकरे गटाकडून अनिल परब, आशिष चेंबुरकर, सुनील शिंदे, तर मनसेकडून बाळा नांदगावर, नितीन सरदेसाई, यशवंत किल्लेदार यांनी वरळीतील एनएससीआयची पाहणी केली.

## नांदेड जिल्ह्यातील २८ कृषी सेवा केंद्रांवर कारवाई

- १२ बियाणे, खत, कीटकनाशक विक्रेत्यांचे परवाने कायमस्वरूपी रद्द
- १४ बियाणे विक्रेत्यांचे परवाने निलंबित

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील यावर्षाच्या खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने कृषी सेवा केंद्रांची व्यापक तपासणी मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेत कृषी सेवा केंद्रामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता आढळून आली आहे. नियमबाह्य कामकाज करणाऱ्या तसेच तपासणीमध्ये त्रुटी आढळल्याने दोषी ठरलेल्या एकूण २८ कृषी सेवा केंद्रांवर कारवाई करण्यात आलेली आहे, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी दिली आहे. ज्यात १२ बियाणे, खत, कीटकनाशक विक्रेत्यांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करुन १४ बियाणे विक्रेत्यांचे परवाने निलंबित केले आहेत.

काही दिवसांपूर्वीच विनापरवाना खताची अवैध विक्री केल्याच्या कारणावरून इस्लापूर व हिमायतनगर येथे अवैध खत विकणाऱ्या विक्रेत्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नियमबाह्य कामकाज करणाऱ्या इस्लापूर तालुक्यातील एका कृषी सेवा केंद्राचे तिन्ही परवाने कायमस्वरूपी निलंबित करण्यात आले आहेत. या दुकानांमध्ये परवाना नसलेले एचटीबीटी बियाणे यांची वाहतुकीच्या पावत्या अवैध्यरित्या दुकानात आढळून आल्याने इस्लापूर येथील कृषी सेवा केंद्रांचे तिन्ही परवाने कायमस्वरूपी निलंबित करण्यात आले आहेत. कृषी विभागाच्या तपासणीत कृषी सेवा केंद्रातील विविध त्रुटी उघड झालेले आहेत. यामध्ये भावफलक व साठा फलक न लावणे, विक्री परवाने दुकानदाराने दर्शनी भागात न लावणे, साठा पुस्तके अद्यावत न ठेवणे, स्त्रोत परवान्यात नमूद नसणे, ग्राहकांना निविष्ठा विक्रीच्या पावत्या न देणे, विक्री अहवाल दर महिन्याला सादर न करणे इत्यादी विविध प्रकारच्या त्रुटी आढळल्या आहेत. त्यांची सुनावणी घेण्यात आली व त्यांना बाजू मांडण्याची संधी देण्यात आली. दरम्यान अशा २८ कृषी सेवा केंद्रांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

याशिवाय विक्री परवानगी घेतली असतानाही दुकान बंद ठेवणाऱ्या केंद्रावरही मोहिमेत विशेष लक्ष देण्यात आलेले आहे. या कारवाईमध्ये तालुका नायगाव येथील आठ कृषी सेवा केंद्राचा समावेश असून हदगाव तालुक्यातील दोन कृषी सेवा केंद्र तसेच नांदेड तालुक्यातील एक कृषी सेवा केंद्र, देगलूर तालुक्यातील दोन कृषी सेवा केंद्र, कंधार तालुक्यातील एक कृषी सेवा केंद्र, किनवट तालुक्यातील पाच कृषी सेवा केंद्र, मुखेड तालुक्यातील दोन कृषी सेवा केंद्र, उमरी तालुक्यातील पाच कृषी सेवा केंद्र, लोहा तालुक्यातील एक व मुदखेड तालुक्यातील एक कृषी सेवा केंद्र यांचा समावेश आहे. खरीप हंगामात शेतकऱ्यांना योग्य वेळी आणि नियमानुसार सेवा मिळाव्यात यासाठी ही मोहिम हाती घेण्यात आलेली आहे.

## नशेच्या औषधी विक्री करणाऱ्या मेडिकल स्टोअर्सविरुद्ध कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील विविध भागातील औषधी दुकानांच्या तपासणी करून अशा औषधांची, गोळयांची विक्री करणाऱ्या औषध विक्रेत्यावर कडक कारवाई करण्याचे निर्देश नुकतेच नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी दिले होते. नांदेड शहरात दाखल झालेल्या पथकाने २५ व २६ जून रोजी शहरातील विविध भागातील मेडिकल स्टोअर्सची तपासणी केली आहे. नशेच्या औषधी, गोळयांची विक्री करणाऱ्या मेडिकल स्टोअर्सविरूद्ध कडक कारवाई केली जाणार असल्याची माहिती नांदेड येथील सहायक आयुक्त (औषधे) अ. तु. राठोड यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

या कार्यवाहीत एकूण १३ मेडिकल स्टोअर्सची तपासणी करण्यात आली. त्यापैकी २ दुकानामध्ये नशेच्या औषधांची, गोळयाची विक्री होत असल्याचे स्पष्ट झाले. इतर ९ मेडिकल स्टोअर्सकडे औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याखालील नियम १९४५ मधील नियम ६५ नुसार त्रुटी आढळून आलेल्या आहेत. उर्वरित २ मेडिकल स्टोअर्सकडे तपासणी दरम्यान सर्वसाधारण त्रुटी आढळलेल्या आहेत.

कोटा राजस्थानच्या धर्तीवर नांदेड शहर हे शैक्षणिक हब तयार झाले असून याठिकाणी राज्यातून तसेच पराज्यातून मुले शिक्षणासाठी नांदेड येथे वास्तवास आहेत. अशा मुलांना मेडिकल स्टोअर्सवरून नशेच्या औषधांची व गोळयाची सहज उपलब्ध होत असल्याचे खासदार रविंद्र चव्हाण यांनी नुकत्याच संपन्न झालेल्या जिल्हा नियोजन भवन येथील जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत नमूद केले होते. त्यामुळे तरुणपिढी नशेच्या आहारी जाऊन व्यसनाधीन होत असल्याची चिंता व्यक्ती केली होती.

## राजू शेट्टी यांच्यासह ४०० जणांवर गुन्हे दाखल

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील महायुती सरकारचा अतिशय महत्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या नागपूर ते गोवा प्रस्तावित शक्तिपीठ महामार्गाच्या विरोधात मंगळवारी राज्यातील बारा जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांनी एल्गार पुकारला. या प्रकरणाला आता वेगळं वळण लागलं आहे. शक्तीपीठ महामार्ग विरोधात आंदोलन केल्या प्रकरणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष आणि माजी खासदार राजू शेट्टी यांच्यासह ४०० जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

## ग्रामीण भागातील गुंठेवारीला मुदतवाढ मिळणार

### महसूल मंत्री बावनकुळे यांची आ. आनंदराव बोंढारकर यांच्याशी सकारात्मक चर्चा


**नांदेड (प्रतिनिधी)–** ग्रामीण भागातील गुंठेवारी बंद असल्यामुळे जमिन खरेदी–विक्रीचे सगळे व्यवहार ठप्प आहेत. यातून अनेक समस्या निर्माण झाले असल्याने मालमत्ता धारकांना दिलासा देण्यासाठी ग्रामीण भागातील गुंठेवारीला मुदतवाढ देण्यात यावी अशी मागणी आ. आनंदराव बोंढारकर यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली आहे. या मागणीबाबत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी सकारात्मक चर्चा झाली असून ही मुदतवाढ लवकरच मिळेल असा विश्वास आ. बोंढारकर यांनी व्यक्त केला आहे.



विधानसभेच्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनादरम्यान बुधवारी आ. बोंढारकर यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली. यावेळी आपल्या मागण्यांचे निवेदन त्यांनी सादर केले. यावेळी आ. राजेश पवार यांचीही उपस्थिती होती. ग्रामीण भागातील गुंठेवारीला २२ ऑगस्ट २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतर तब्बल दोन वर्षांचा कालावधी लोटत आला असतानाही अद्यापही ग्रामीण भागातील मालमत्तांना मुदतवाढ देण्यात आलेली नाही. त्यामुळे मालमत्ता खरेदी विक्रीचे संपूर्ण व्यवहार ठप्प झाले आहे. यातून ग्रामीण भागातील मालमत्ता धारकांसमोर आर्थिक संकट उभे ठाकले आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक फीस भरण्यासाठी, मुलींचे लग्न करण्यासाठी आणि दैनंदिन व्यवहारात आवश्यक असणाऱ्या व्यवहारासाठी आणि पैशासाठीही मोठ्या अडचणी निर्माण झाल्या असल्याने ग्रामीण भागातील मालमत्ता 'असून अडचण नसून खोळंबा' ठरत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील आर्थिक व्यवहार पुन्हा एकदा सुरळीत करण्यासाठी गुंठेवारी मुदत वाढ देण्यात यावी अशी मागणी आ.बोंढारकर यांनी केली आहे.

दरम्यान महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या अनुषंगाने सकारात्मक पावले उचलली असून गुंठेवारीला मुदतवाढ देण्याच्या अनुषंगाने संबंधित विभागाला कळविले असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे लवकरच ग्रामीण भागातील गुंठेवारीचा प्रश्न मार्गी लागून मालमत्ता धारकांना मोठा दिल्यास मिळेल असा विश्वास ही आ. बोंढारकर यांनी व्यक्त केला आहे.



जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# आता चीनचा 'कृषी दहशतवाद'

आज जगातील संघर्षांची व्याख्या बदलत चालली आहे. युद्ध हे आता रणभूमीवर रणगाड्यांमधून लढलं जात नाही, तर शत्रूला अदृश्य अस्त्रांनी, जैविक शस्त्रांनी आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने पाडण्याचे युग सुरू झाले आहे. कोरोना महामारीनं जगाला याची पहिली चव चाखवली. पण आता या जैविक युद्धाचा नवा टप्पा सुरू झाला आहे, तो म्हणजे शेतातील पिकांवर हल्ला करून अन्नसाखळीचा नाश करण्याचा. या नव्या प्रकाराला आता शास्त्रज्ञांनी 'कृषी दहशतवाद' असं नाव दिलं आहे. अशा प्रकारचे विध्वंसक कार्य करणारा एकमेव देश आपल्या जगामध्ये आहे, तो म्हणजे चीन. संपूर्ण जगामध्ये कोरोनाचा फैलाव करून हजारो लोकांना ठार करण्याचे षडयंत्र याच देशाने सुरू केलं होतं. याच देशाकडून आता कृषी दहशतवादाच्या नावाने हा नव्याने दहशतवाद सुरू होतो आहे. अमेरिकेत नुकत्याच घडलेल्या एका प्रकरणानं संपूर्ण कृषी आणि सुरक्षाव्यवस्थेला हादरवून टाकलं. मिशिगन विद्यापीठातील युनकिंग जियान या चिनी संशोधिकेला 'फ्युसेरियम ग्रॅमिनेरम' नावाच्या धोकादायक बुरशीची तस्करी केल्याप्रकरणी अटक करण्यात आली. तिचा सहकारी आणि प्रियकर झुन्योंग लिऊ याने या बुरशीच्या अमेरिकन भूमीवरील प्रवेशात सहकार्य केल्याचे समोर आले आहे. ही बुरशी साधी नाही, ती गहू, मका, भात, बाजरी यांसारख्या महत्त्वाच्या धान्यांवर हल्ला करते आणि त्यांचं उत्पादन निकृष्ट करत जाते. त्यामुळे केवळ अन्नधान्याची कमतरता निर्माण होत नाही, तर या पिकांमुळे माणसांमध्येही उलट्या, यकृत विकार, आणि पुनरुत्पादक दोष निर्माण होतात. या बुरशीवर प्रयोग करून ती आणखी धोकादायक बनवण्याचा प्रयत्न होत होता, असा आरोप एफबीआयनं केला आहे. विशेष म्हणजे चीन सरकारकडून संशोधनासाठी निधीही पुरवण्यात आल्याचं प्राथमिक चौकशीत स्पष्ट झालं आहे. विशेष म्हणजे भारतासारखे देश, जिथे अर्थव्यवस्था कृषीप्रधान आहे, त्यांच्यासाठी हा धोका अत्यंत गंभीर ठरू शकतो. अन्न टंचाई, महागाई, आणि सामाजिक अस्थिरता यांचा उद्रेक करून शत्रुराष्ट्र आपला हेतू साध्य करू शकतो. शत्रुराष्ट्राला कमकुवत करण्यासाठी शेतीक्षेत्रावर जैविक शस्त्रांद्वारे हल्ला करणे म्हणजेच 'कृषी दहशतवाद'. या संज्ञेचा पहिला वापर १९९९ मध्ये अमेरिकन पशुवैद्यकीय तज्ज्ञ कोरी ब्राऊन यांनी केला. त्यांचं म्हणणं होतं की, अन्नसुरक्षा धोक्यात आणण्यासाठी विषाणू, बुरशी किंवा कीटकांच्या माध्यमातून पिकांवर हल्ला केला जाऊ शकतो. यामुळे उत्पादन कमी होतं, निकृष्ट धान्य तयार होतं, रोगांचं प्रमाण वाढतं आणि संपूर्ण देशाच्या अन्नसाखळीला हादरा बसतो. कृषी दहशतवाद काही नवा प्रयोग नाही. १२ व्या शतकात चंगेज खानने शत्रूच्या अन्नपुरवठ्यावर वार करण्यासाठी आजारी गुरे पाठवली होती. दुसऱ्या महायुद्धात जर्मनीने ब्रिटनच्या बटाटा पिकावर कोलोरॅडो बीटल नामक कीटकांचा मारा करण्याचा प्रयत्न केला. व्हिएतनाम युद्धाच्या काळात अमेरिकेने 'ऑपरेशन रांच हेड'अंतर्गत झाडाझुडपांवर रसायनांचा मारा केला, ज्यामुळे पिकं उभी न राहता आडवी झाली. या घटनांमधून स्पष्ट होते की, शेतीवर जैविक व रासायनिक हल्ले करणे ही केवळ कल्पनाच नाही, तर अंमलात आणलेली कृती आहे. अमेरिकेतील काही कृषीतज्ज्ञांच्या मते, 'फ्युसेरियम' ही बुरशी नवीन नाही आणि तिच्यावर कीटकनाशके वापरून नियंत्रण मिळवता येऊ शकतं. पण खरी भीती तिच्या हेतुपुरस्सर वापराची आहे. जर संशोधक ठरवून या बुरशीला अधिक धोकादायक बनवत असतील, तर हा प्रयोग केवळ शास्त्रीय न राहता षड्यंत्रात्मक होतो. गॉर्डन चांग या अमेरिकेतील चिनी धोरण विश्लेषकांनी ही कृती अमेरिकेच्या विरोधातील युद्धसदृश कारवाई असल्याचे म्हटले आहे. त्यांनी इशारा दिला की, चीनच्या अशा कृतींना वेळीच उत्तर दिलं नाही, तर पुढचा हल्ला कोरोनापेक्षाही घातक असू शकतो. भारतासारख्या देशाने या संकल्पनेला केवळ अमेरिकन पार्श्वभूमीत न पाहता, स्वतःच्या संदर्भातही गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. आपल्या देशात कृषी जैवविविधता प्रचंड असून, तिचं संरक्षण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर धोरणात्मक पावलं उचलणं गरजेचं आहे. प्रत्येक बियाणं, खत, कीटकनाशक आणि प्रयोगशाळा तपासणीच्या पारदर्शक यंत्रणेत बांधलं गेलं पाहिजे. शेतीवर शस्त्रास्त्र चालवणं म्हणजे केवळ अन्नधान्याचा नाश नव्हे, तर समाजाच्या मूलभूत आधारस्तंभावर हल्ला आहे. याला वेळेवर ओळखून, शास्त्र, सुरक्षा, कृषी आणि आरोग्य विभागांनी मिळून एक बहुआयामी उपाययोजना आखणं ही काळाची गरज आहे.

# उच्च शिक्षणातील गुणवत्तेचे परिवर्तनशील सूत्र



भारतात उच्च शिक्षण संस्थांची संख्या झपाट्याने वाढत असताना 'गुणवत्ता' हा शब्द केवळ प्रमाणीकरणासाठी वापरण्यापुरता मर्यादित राहता कामा नये. तो एक स्थूल आणि सतत प्रगत होत जाणारा आराखडा असायला हवा जो विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व व्यावसायिक विकासाला दिशा देईल. आजच्या शिक्षणव्यवस्थेतील मूलभूत प्रश्न असा आहे की, शिक्षण हे केवळ ज्ञानदानापुरते मर्यादित असावे का, की त्यातून सखोल आत्मचिंतन, चिंतनशीलता, आणि आयुष्यभर शिकण्याची वृत्ती निर्माण व्हायला हवी?

**गुणवत्तेच्या मूल्यांकनाची नवी दृष्टी**

गेल्या काही दशकांत राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद आणि इतर राष्ट्रीय-अंतरराष्ट्रीय संस्था केवळ गुणवत्तेची यादी तपासणाऱ्या यंत्रणा राहिल्या नाहीत. त्यांनी शैक्षणिक संस्थांकडे 'प्रणाली-केंद्रित दृष्टीकोन' स्वीकारण्याचा आग्रह धरला आहे. यामध्ये गुणवत्ता ही एक प्रक्रिया मानली जाते ज्यामध्ये मनुष्यबळ, पायाभूत सुविधा आणि आर्थिक साधने या इनपुट्सना अध्यापन, संशोधन आणि प्रशासनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात रूपांतरित केले जाते.

**विद्यार्थ्यांचे 'सक्रिय' स्थान**

या प्रक्रियेच्या केंद्रस्थानी 'विद्यार्थी' असतो. तो एक निष्क्रिय श्रोता नसून, ज्ञाननिर्मितीतील सक्रिय भागीदार असतो. त्यामुळे अध्यापन ही क्रिया पाठांतरावर न थांबता समज, विश्लेषण, आणि आकलन यावर आधारित असली पाहिजे. ही गुणवत्ता परीक्षा गुणांपुरती मर्यादित न राहता, विद्यार्थ्यांच्या दीर्घकालीन व्यावसायिक क्षमता, सामाजिक योगदान, आणि वैयक्तिक समाधानापर्यंत पोहोचली पाहिजे.

**गुणवत्ता म्हणजे एक गतिशील आराखडा**

गुणवत्तेचे मूल्यांकन हे एक स्थिर ध्येय नसून, सतत बदलत जाणारा, भविष्यातील आव्हानांना सामोरे जाणारा विचारसरणीचा भाग आहे. 'गुणवत्ता' ही दोन मुख्य परिमाणांतून पाहिली जाते जसे जबाबदारी व परिवर्तनशीलता. एकीकडे गुणवत्ता ही मानके, निकष, आणि अनुपालन यांवर आधारित आहे; तर दुसरीकडे ती वैयक्तिक वाढ, बौद्धिक प्रगल्भता आणि दीर्घकालीन परिणाम यांवर आधारलेली आहे.

**गुणवत्तेच्या विविध परिमाणांचा समावेश**

उच्च शिक्षणातील गुणवत्ता समजून घेण्यासाठी खालील पाच दृष्टिकोन महत्त्वाचे ठरतात:

१. उत्कृष्टतेचा दृष्टिकोन: शिक्षण संस्थेने अत्युच्च मानके पाळावी, जागतिक दर्जाचे संशोधन, प्रावीण्य असलेले प्राध्यापक व दर्जेदार परीणाम मिळवावेत.

२. परिपूर्णतेचा दृष्टिकोन: औद्योगिक दर्जाच्या मानकांप्रमाणे त्रुटीशून्य, प्रक्रियापूर्ण आणि स्थिरतेवर आधारित गुणवत्तेची अंमलबजावणी.

३. उद्दिष्टपूर्ततेचा दृष्टिकोन: संस्थेने ज्या उद्दिष्टांची घोषणा केली आहे, ती उद्दिष्टे प्रत्यक्षात कितपत साध्य केली गेली आहेत, याचे मूल्यांकन.

४. गुणवत्तेचा आर्थिक परिप्रेक्ष: शिक्षणावर होणारा खर्च आणि त्यातून मिळणारा व्यावसायिक लाभ, म्हणजेच 'व्हॅल्यू फॉर मनी'.

५. परिवर्तनात्मक दृष्टिकोन: ही सर्वाधिक आशयघन व्याख्या आहे, जी विद्यार्थ्यांच्या आंतरिक परिवर्तनावर लक्ष केंद्रित करते केवळ शिकवण नाही, तर विद्यार्थ्यांमध्ये चिंतनशीलता, नैतिकता, आणि आयुष्यभर शिकण्याची क्षमता निर्माण करणे.

**परिवर्तनशील शिक्षणाचा 'सदृढ' आराखडा**

आजच्या नवकल्पनायुक्त युगात, शिक्षणसंस्थांनी केवळ अभ्यासक्रम शिकवून परीक्षेचे निकाल लावणाऱ्या पद्धतीपेक्षा अधिक व्यापक भूमिका घ्यावी लागेल. शिक्षणमूल्य हे विद्यार्थ्याच्या सर्वांगीण अनुभवावर आधारित असते. यात अध्यापन केवळ माहितीपुरते मर्यादित राहत नाही, तर शिक्षक ही भूमिका 'मार्गदर्शक' आणि 'सहप्रवासी' अशी होते.

विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील अर्थपूर्ण संवाद ही ज्ञाननिर्मितीची खरी पार्श्वभूमी ठरते. या दृष्टिकोनात 'अध्यापनातून शिकवणे' नव्हे, तर 'शिकण्यातून शिक्षण घडवणे' हे केंद्रबिंदू आहे.

**संस्थात्मक मूल्यांकनाचे प्रमुख निकष**

खरी गुणवत्ता फक्त महाविद्यालयाच्या रँकिंगमध्ये नव्हे, तर ठोस निकषांवर आधारित असते जसे स्पष्ट धोरण, उद्दिष्टे व मूल्ये, विद्यार्थीकेंद्रित आधार सेवा, तांत्रिकदृष्ट्या सुसज्ज अभ्यासक्रम,

**प्रेरणादायी आणि कुशल प्राध्यापक**

कौशल्याधारित आणि प्रासंगिक शिक्षण वातावरण आणि व्यावसायिक तयारी व रोजगारक्षमतेची हमी.

याशिवाय, उच्च शिक्षणसंस्था ही सामाजिक जबाबदारी स्वीकारणारी संस्था असावी लागते. यासाठी संसाधनांचा प्रभावी वापर आणि त्रुटीविरहित सेवा पुरवणे आवश्यक असते.

**भविष्यासाठी गुणवत्ता सुनिश्चितीचा मार्ग**

गुणवत्तेच्या मूल्यांकनासाठी निकष हे केवळ तपासणीसाठी नव्हे, तर सुधारण्यासाठी असतात. संस्थांनी आपली उद्दिष्टे स्पष्टपणे मांडून, त्यास अनुसरून कार्यपद्धती विकसित केली पाहिजे. आजच्या गतिशील आणि स्पर्धात्मक युगात ही दृष्टिकोनात्मक जाणीव शिक्षणसंस्थांना दीर्घकाळ प्रासंगिक ठेऊ शकते.

या संदर्भात, गुणवत्तेचे मूल्यांकन म्हणजे एका ध्येयाकडे नेणारी रोडमॅप आहे. हे निकष संस्थेच्या नियोजनास ठोस दिशा देतात, त्यांची कृतीनिष्ठा दृढ करतात आणि शिक्षणाच्या क्षेत्रात विश्वासार्हता निर्माण करतात.

उच्च शिक्षणातील गुणवत्ता ही एक बहुआयामी संकल्पना आहे. ती केवळ गुणांवर आधारित नसून, ती संस्थेच्या उद्दिष्टपूर्ततेपासून, विद्यार्थ्याच्या वैयक्तिक व सामाजिक बदलांपर्यंत पोहोचते. योग्य निकष आणि स्पष्ट धोरणांच्या मदतीने संस्थांनी फक्त आजची अपेक्षा पूर्ण न करता, भविष्यासाठीही स्वतःला सक्षम बनवले पाहिजे.

अशा परिवर्तनशील आणि विद्यार्थीकेंद्रित दृष्टीकोनानेच खऱ्या अर्थाने शिक्षणसंस्था गुणवत्तेच्या दिशेने वाटचाल करू शकतात. केवळ माहिती देणाऱ्या नाही, तर व्यक्तिमत्व घडवणाऱ्या बनू शकतात.

**-प्रा. सु. ग. जाधव**
नांदेड
मो.९४२३१४०७४१

# 'नन्हे फरिश्ते' मुळे फुलले हास्य

घरात भांडण होणे, गर्दीत हरवणे, पुण्या-मुंबईसारख्या मोठ्या शहराचे आकर्षण, या आणि अशा अनेक कारणांमुळे राज्यातील अनेक मुले पुण्या - मुंबईसारख्या मोठ्या शहरात दाखल होतात. कुटुंबाशी ताटातूट झालेली ही मुलं पुण्या - मुंबईतील रस्त्यांवर, फुटपाथवर, रेल्वे स्टेशनवर, बस स्टॉपवर भटकत असतात. भीक मागून पोटाची खळगी भागवत असतात. यातील काही मुले वाम मार्गाला लागतात तर काही मुले असेच अनाथ म्हणून भटकत असतात. तर काही मुलांना गुंड मवाली जबरदस्तीने भीक मागायला लावतात. त्या मुलांचा गुंड मवाली अतोनात छळ करत असतात. या मुलांना पुन्हा स्वगृही पाठवण्यासाठी रेल्वे सुरक्षा दलाने (आरपीएफ) नन्हे फरिश्ते ही मोहीम राबवली.



या मोहिमे अंतर्गत एप्रिल आणि मे या दोन महिन्यांच्या कालावधीत मध्य रेल्वेच्या पाचही विभागातील वेगवेगळ्या स्थानकांत रेल्वे संरक्षण दलाच्या विशेष पथकाने (आरपीएफ) २३५ मुलांचा शोध घेऊन या मुलांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात दिले. ही सर्व मुले १२ ते १५ वयोगटातील आहेत. एकट्या पुणे स्थानकात एप्रिल आणि मे या दोन महिन्यात ५१ मुलांचा शोध घेऊन रेल्वे सुरक्षा दलाच्या विशेष पथकाने (आरपीएफ) या मुलांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात दिले. विशेष म्हणजे शोधलेल्या या मुलांमध्ये पोलीस ठाण्यात नोंद नसलेलीही काही मुले आहेत. ऑपरेशन नन्हे फरिश्ते ही मोहीम रेल्वे सुरक्षा दलाकडून मागील सात वर्षांपासून राबवण्यात येत आहे. २०१८ मध्ये ऑपरेशन नन्हे फरिश्ते या मोहिमेची सुरुवात झाली. आपल्या आई-वडिलांपासून ताटातूट झालेली, घरातून निघून पुण्या - मुंबई सारख्या मोठ्या शहरात पळून आलेली, हरवलेल्या अल्पवयीन मुला-मुलींना पुन्हा आपले आई-वडील मिळावेत, त्यांना त्यांचे घर पुन्हा मिळावे यासाठी ही मोहीम राबवली जाते. मध्य रेल्वेच्या रेल्वे सुरक्षा दल, रेल्वे पोलीस, रेल्वे कर्मचारी यांच्या समन्वयातून ऑपरेशन नन्हे फरिश्ते ही मोहीम राबवली जाते.


या मोहिमेअंतर्गत रेल्वे सुरक्षा दलाने रेल्वे डब्यात, रेल्वे स्थानकात किंवा रेल्वेच्या हद्दीत हरवलेल्या किंवा पुण्या - मुंबईत पळून आलेल्या हजारो मुलांची सुटका केली.

या मोहिमेमुळे हजारो अल्पवयीन मुलांच्या व त्यांच्या पालकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले असून, आई वडिलांकडून, कुटुंबापासून दुरावलेली हजारो मुले आपल्या आई-वडिलांच्या कुशीत सामावली आहेत. ही मोहीम राबवण्यासाठी रेल्वे सुरक्षा दलाने विशेष आराखडा तयार केला. रेल्वेच्या हद्दीत ज्या ठिकाणी अल्पवयीन मुले-मुली भीक मागत आहेत अशी ठिकाणे पोलिसांनी शोधून काढली. या ठिकाणी पोलिसांनी अतिशय गुप्तपणे कारवाई केली. या मुलांना भीक मागायला लावणाऱ्या रॅकेटचा शोध घेतला आणि त्यांना अटक करून हजारो मुलांची सुटका केली. मानसोपचार तज्ज्ञांची मदत घेऊन या मुलांचे प्रबोधन करण्यात आले. या मुलांच्या पालकांचा शोध घेऊन या मुलांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्याचे मोठे आव्हान रेल्वे सुरक्षा दलाच्या पोलिसांसमोर होते. ते आव्हान पोलिसांनी लीलिया पेलले आहे. ही मोहीम अतिशय स्तुत्य आणि अनुकरणीय अशी आहे. ही मोहीम राबवणाऱ्या रेल्वे सुरक्षा दलाचे जितके कौतुक करावे तितके कमी आहे.

रेल्वे सुरक्षा दलाने ही मोहीम राबवून हजारो मुला-मुलींना अनाथ होण्यापासून आणि वाम मार्गाला लागण्यापासून वाचवले आहे. ही मोहीम राबवणाऱ्या अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना मनापासून धन्यवाद द्यावे लागेल. मुंबई पोलीस दलातर्फे देखील 'ऑपरेशन मुस्कान' नावाची अशीच एक मोहीम राबविण्यात येते. या मोहिमे अंतर्गत देखील हजारो मुला-मुलींना त्यांच्या पालकांकडे, कुटुंबाकडे सुपूर्त करण्यात आले आहे. ऑपरेशन नन्हे फरिश्ते, ऑपरेशन मुस्कान या सारख्या मोहिमा फक्त पुण्या - मुंबई पुरत्याच मर्यादित न राहता सर्व महानगरात राबवायला हव्यात म्हणजे बेघर झालेली लाखो मुले स्वगृही परततील आणि स्वगृही परतणाऱ्या या मुलांच्या आणि पालकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलेल.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# चला, आयुष्याचे संकेत ओळखूया!



खरोखरच आयुष्य किंवा जीवन म्हणजे नेमके काय? हा एक अनुत्तरीत प्रश्न असून, याचे नेमके उत्तर शब्दांच्या चौकटीत बसवणे कुणालाही शक्य नाही,हे असे असले तरीही आजपर्यंत अनेक कवी, लेखक यांनी आयुष्यावर किंवा जीवनावर अनेक उत्तम

कलाकृती निर्माण करून, ते समजावून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात तो जसा ज्याला उमगला तसा त्याने मांडला आहे... आयुष्य कुणाला पहाटे पडलेले सुंदर स्वप्न तर कुणाला पुस्तकावरच्या सुंदर व आकर्षक मुख पृष्ठा सारखे दिसले आहे, जे वरून अतिशय सुंदर पण आतून मात्र सुखदुखांचे पान असलेले बहुरंगी पुस्तक आहे.. तर कुणाला इंद्रधनुष्यातील सप्तरंगांसारखे भासले आहे. आयुष्य ही ज्याच्या त्याच्या दृष्टीला तशी तशी दिसलेली गोष्ट असावी बहुदा..

आयुष्य नेमके कशाला म्हणावे या भानगडीत न पडता,किंवा आयुष्याला निश्चित व्याख्येच्या बेडीत न अडकवता ते कसे जगावे हे मात्र नक्कीच आपल्या हातात असते, इंग्रजीत पुढील प्रमाणे म्हटल्याप्रमाणे,

"The mind has it's own place and in itself, can make a heaven of a hell or a hell of a heaven."

घटकाभर मिळालेल्या अनिश्चित आयुष्याचे सुवर्ण/स्वर्ग करायचे, का त्याचा कोळसा/नर्क बनवायचे, हे मात्र आपल्या हातात असून, आपल्या कृतीवर ते अवलंबून असते. आयुष्य पुढे जाऊन काहीतरी करण्याची सुवर्णसंधी देते, आपण ही संधी ओळखून आपल्या आयुष्याचे सुवर्णही करू शकतो व आपल्या कार्यातून आणि विचारातून आपल्या अस्तित्वाचा ठसा काळाच्या पटलावर कायमचा उमटवू शकतो. आपल्या भोवताली असे अनेक लोक दिसतात, ज्यांनी संधी आल्यावर सुद्धा त्यांच्या उदासीन आणि निष्क्रिय वृत्तीमुळे ती संधी गमावली व दुसरीकडे असेही लोक दिसतात, की ज्यांनी सभोवताली संधीची धूसर शक्यता असताना सुद्धा परिस्थितीप्रमाणे स्वतःला सकारात्मक वळण देऊन, त्यातून ती संधी स्वतःकडे खेचली आणि आपल्या आयुष्याचे सोने केले..

आयुष्य अनेक वेगवेगळ्या रस्त्यावरून आपल्याला प्रवास करायला लावते. जसे वळण आले तसे आपण वळलो नाही, तर अपघात होणे अटळ असल्याने, वळणानुसार वळणे हे आपल्याला जमायलाच हवे. बऱ्याचदा मनाचा संयम तोडणाऱ्या काही अनिश्चित घटना, अनपेक्षितपणे घडत असतात मग अशा परिस्थितीत मनाला संयमाचे खतपाणी घालत, आपल्याला आपल्या जगण्याच पीक वाढवत न्यावे लागते... आयुष्य आपल्या मनाप्रमाणे चालेल किंवा प्रत्येक घटना आपल्या मनासारखीच घडण्याची सुतराम शक्यता नसते, त्यामुळे काळाची पावले ओळखून आपण आपली पावले सांभाळून टाकली, तर जगण्याचा रस्ता व अंतर सुरक्षितपणे पार करता येते..

आयुष्य तसे पाहता सुख आणि दुःख यांचा सुंदर मिलाप असून,आयुष्य आपणाला काहीच क्षण सुखाचे व काही क्षण दुःखाचे देते. सुखाने हुरळून न जाता व दुःखाने खचून न जाता, परिस्थिती नुसार स्वतःला सकारात्मक ठेऊन जगण्याच्या रस्त्यावर पुढे पुढे मार्गक्रमन करत गेले, की नक्कीच जगण्याला प्रेरणा मिळत राहते व सोबतच सातत्याचा संघर्ष यशाची फळ सुद्धा चाखायला देत असतो, गरज कमालीच्या संयमाची असून, आयुष्याचे चकवे व संकेत ओळखून हळु हळू पुढे जावे लागते. आयुष्य अनिश्चित घटना घडामोडींनी भरलेला घडा असून त्या घड्यातील पाणी संपले, की त्यात कठोर प्रयत्नाने सकारात्मकतेचे पाणी भरत रहावे लागते..मग सकारात्मकतेचा हाच घडा जगण्याला नवीन दिशा देत, आपल्याला आपल्या जगण्याची नाव सुरक्षित यशाच्या किनाऱ्यापर्यंत घेऊन जायला मदत करत असतो..

आयुष्य नावाच्या नाण्याची एक बाजू सकारात्मक, तर दुसरी नकारात्मक असून आपल्याला केवळ सकारात्मक बाजूचा विचार करून जगावे लागते, तरच आयुष्याचा आनंद आपल्याला घेता येतो. आयुष्य जगत असताना आपला सभोवताल सुद्धा आपल्यावर प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे प्रभाव टाकत असतो,पण केवळ सकारात्मक लोकांच्या संगतीचा प्रभाव आपल्यावर झाला, तरच आपल्या आयुष्याचा गाडा सुरळीत सुरु राहतो. नाहीतर भोवतालात असंख्य नकारात्मक शक्ती आपला पसारा मांडून बसलेल्या असतात, आता हा आपला प्रश्न असतो, की कुठल्या शक्तीचा प्रभाव आपण आपल्यावर होऊ द्यावा. जगणे सकारात्मक संगती आणि शक्तीच्या प्रभावाखाली येऊन स्वर्ग बनू शकते, तर नकारात्मक संगती आणि शक्तीच्या प्रभावाखाली त्याच जगण्याचा नर्क सुद्धा होऊ शकतो. आपल्याला आपल्या हयातीतच जगण्याचा स्वर्ग बनवता येते एवढे मात्र नक्की, यासाठी आपली वृत्ती आणि कृती सकारात्मक असणे अतिशय आवश्यक असते..

आयुष्य आज सुखाची सावली घेऊन आले असेल, तर उद्या हेच आयुष्य दुःखाचे तप्त ऊन सुद्धा घेऊन येणार असते, त्यामुळे आयुष्य सुख दुख आणि अनिश्चित घटना घडामोडींचा अथांग पसारा असून, आपण दोन्ही परिस्थितीमध्ये तटस्थ राहून, जगण्याला सुरक्षित किनारा प्रदान करण्याचा प्रयत्न करत रहावे दुसरे काय.. आयुष्य नावाच्या अनिश्चित काळासाठी मिळालेल्या उत्तम नैसर्गिक देणगीचा आपल्याला आपल्या सकारात्मक वृत्तीतून स्वर्ग बनवता येते व काळाच्या काळजावर आपले नाव कोरून विचाराने चिरंतन राहता येते एवढे मात्र नक्की..म्हणून आयुष्याचे साधक- बाधक, काळे-गोरे, सकारात्मक- नकारात्मक आणि बहुरंगी संकेत ओळखून पाऊले टाकूया, चला आयुष्याचे संकेत ओळखू या...

**-प्रा. अमित शिंदे**
मु.पो. रोही पिंपळगाव
ता. मुदखेड, जि. नांदेड

# संवादफेकीचा बेताज बादशहा : 'जानी' राजकुमार!



३ जुलै हा आपल्याच धुंदीत जगणाऱ्या आणि बॉलीवूडने डोक्यावर घेतलेल्या संवादाचा बादशहा जानी राजकुमार या अभिनेत्याचा स्मृतिदिन. ८ ऑक्टोबर १९२६ ला बलुचिस्तान येथे जन्मलेल्या आणि सुरुवातीस मुंबईत पोलिस इन्स्पेक्टर ची नोकरी करणाऱ्या राजकुमारने (मूळ नाव कुलभूषण पंडित) 'शाही बाजार' (१९५२) या चित्रपटाद्वारे सिनेसृष्टीत पाऊल ठेवल्यानंतर १९५७ ला आलेलया मेहबूब खानच्या 'मदर इंडिया' या चित्रपटातील शेतकऱ्याच्या छोट्याश्या भूमिकेने दर्शकांवर छाप पाडली. त्यानंतर त्यांनी पैगाम, दिल अपना और प्रीत पराई, काजल, वक्त, पाकिजा,बुलंदी,नीलकमल, हमराज, मेरे हुजूर,हिर रांझा, सौदागर, तिरंगा आदी चित्रपटातून दमदार अभिनय आणि आपल्या विशिष्ट शैलीतील संवादफेकीने संपूर्ण चित्रपटसृष्टी वर राज्य केले. डायलॉग किंग अशी उपाधी मिळालेल्या राजकुमार यांचे 'ये बच्चों के खेलने की चीज नहीं, हाथ कट जाए तो खून निकलने लगता है', 'जिनके घर शीशे के बने होते हैं वो दूसरों पर पत्थर नहीं फेंकते' (वक्त) आणि 'आपके पॉव बहुत खूबसूरत हैं, इन्हें ज़मीन पर मत रखिए, मैले हो जाएंगे (पाकीजा) हे त्याकाळी गाजलेले संवाद आजही अमर आहेत. राजकुमार यांचे नाव घेतले की आठवतो तो त्यांचा भारदस्त आवाज आणि त्यांचे अजरामर डायलॉग. केवळ दृश्यच नव्हे तर चित्रपटाच्या पटकथाही राजकुमार यांना डोळ्यांसमोर ठेवूनच लिहिल्या जात असत. 'बुलंदी', 'सौदागर', 'तिरंगा', 'मरते दम तक' ही त्यातील काही उदाहरणे. बॉलिवूडच्या या राजकुमाराचे निधन ३ जुलै १९९६ रोजी झाले. पण अजरामर संवादांमुळे आजही ते सिनेरसिकांच्या हृदयात आहेत. त्यांना विनम्र आदरांजली !

**-प्रा. विजय कोष्टी,**
कवठे महांकाळ (सांगली),
९४२३८२९११७

## थोडक्यात...

### जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यात १५ जुलै २०२५ च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात १५ जुलै २०२५ रोजी मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहील. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही.

### सहकार पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)** – राज्याच्या सहकार चळवळीमध्ये उत्कृष्ट योगदान दिलेल्या राज्यातील सहकारी संस्थांना शासनामार्फत पुरस्कार देवून गौरविण्यात येणार आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत नोंदणी झालेल्या ईच्छूक संस्थांनी आपले विहित नमुन्यातील प्रस्ताव १८ जुलै २०२५ पर्यत तालुक्याचे उपनिबंधक, सहाय्यक निबंधिक यांचेकडे आवश्यक कागदपत्रांसह सादर करावेत, असे आवाहन सहकारी संस्थेचे जिल्हा उपनिबंधक अशोक भिल्लारे यांनी केले आहे.

# गटशेती हा शाश्वत शेतीचा पर्याय –जिल्हाधिकारी

## जिल्हा परिषदेत कृषी दिन उत्साहात साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)** – शेतीमध्ये प्रगती साधायची असेल, तर गटशेती करणे ही काळाची गरज आहे. गटशेती ही शाश्वत शेतीचा प्रभावी पर्याय ठरू शकते, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले. कै. वसंतराव नाईक यांची जयंती व कृषिदिनानिमित्त मंगळवारी जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.



जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, आत्मा, जिल्हा परिषद कृषी विभाग व पंचायत समिती, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, प्र. जिल्हा कृषी अधिकारी सचिन कपाळे, उपविभागीय कृषी अधिकारी अनिल शिरफुले, पशुसंवर्धन आयुक्त डॉ. राजकुमार पडिले, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रविणकुमार घुले, माध्यमिक शिक्षणाधिकारी माधव सलगर, प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, कृषी विज्ञान केंद्र पोखर्णीचे शास्त्रज्ञ प्रा. डॉ. देविकांत देशमुख, प्रा. शेळके तसेच प्रगतिशील शेतकरी कांतराव देशमुख आदींची उपस्थिति होती.

गटशेतीमुळे मजुरांच्या टंचाईचा प्रश्न कमी होतो. तसेच उत्पादन खर्च घटून शेती उत्पादन वाढते. उमेदच्या माध्यमातूनही गटशेतीचे यशस्वी प्रयोग करता येऊ शकतात. चालू वर्षात किमान २०० शेतीगट तयार करण्याचा निर्धार असल्याचे मत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी यावेळी व्यक्त केले. पाणी फाउंडेशनच्या सहकार्याने जलसंधारणाच्या कामांना गती देण्यात येणार असून, कपाशी वेचणी दरम्यान होणारे नुकसान लक्षात घेऊन १५ ते २० हजार शेतकऱ्यांना प्रायोगिक तत्त्वावर कापूस वेचणी बॅग देण्यात येणार आहेत. तसेच पोखरा योजनेअंतर्गत फळबाग लागवडीलाही प्रोत्साहन दिले जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी यावेळी दिली.

कार्यक्रमाच्या सुरवातीला माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी नैसर्गिक शेती, परसबाग व हळद प्रक्रिया या पत्रिकांचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. ड्रोनद्वारे फवारणीचे प्रात्यक्षिकही दाखवण्यात आले.

शेतकरी हा देशाचा पोशिंदा असून, पारंपरिक पद्धतींसोबत नवतंत्रज्ञान स्वीकारणे हे अत्यावश्यक आहे. लोकसंख्या वाढत असताना शेतीचे क्षेत्र स्थिर आहे, त्यामुळे ड्रोन फवारणी, नैसर्गिक शेती, बायो फर्टिलायझर, ड्रिप इरिगेशन यांचा वापर करणे गरजेचे असल्याचे मत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी व्यक्त केले. जिल्हा परिषद उपकर योजनेत सन २०२५-२६ साठी शेतकरी उत्पादन कंपनी व गटशेती करणाऱ्यांना किसान ड्रोन व बायो फर्टिलायझर लॅबसाठी निधी उपलब्ध करून दिला जात आहे. किसान ड्रोनसाठी चार लाखांपर्यंत तर बायो फर्टिलायझर प्रयोगशाळेसाठी १० ठिकाणी दीड लाखांपर्यंत अनुदान देण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

यावेळी राज्य व जिल्हास्तरीय पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांचा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. नैसर्गिक शेती करणाऱ्या ८२ शेतकऱ्यांना प्रमाणिकरण प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. पाणी फाउंडेशनचे संतोष शिनगारे, नैसर्गिक शेती प्रमाणिकरणचे हर्षल जैन, अमोल केंद्रे, प्रगतिशील शेतकरी भगवानराव इंगोले, विशाल शिंदे, उत्तम सोनकांबळे, महमंद गौस आदींनीही आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्र. जिल्हा कृषी अधिकारी सचिन कपाळे यांनी केले. तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राम कवडे यांनी तर उपस्थितांचे आभार वसंत जारिकोटे यांनी मानले. या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे अधिकारी, कर्मचारी व जिल्हयातील शेतकरी मोठया प्रमाणात उपस्थित होते.

# रुग्णांना दिलेल्या तत्पर व दर्जेदार सेवेमुळेच रुग्णालयास पुरस्कार –डॉ. ललिता मनुरकर

## श्यामनगर स्त्री रुग्णालयाला राज्य शासनाचा कायाकल्प पुरस्कार



**नांदेड (प्रतिनिधी)**– श्यामनगर येथील स्त्री रुग्णालयाला प्रसूती व गरोदर मातांना तत्पर व दर्जेदार सेवा उपलब्ध करून दिल्याबद्दल राज्य शासनाचा राज्यस्तरीय कायाकल्प पुरस्कार जाहीर झाला आहे. तीन लाख रुपयांचे पारितोषिक असून रुग्णालयातील डॉक्टर्स व कर्मचाऱ्यांचे परिश्रम व रुग्णसेवेमुळे हा पुरस्कार मिळाल्याची भावना वैद्यकीय अधीक्षक डॉ. ललिता मनुरकर-सुस्कर यांनी व्यक्त केली.

नांदेड शहराच्या भाग्यनगर व श्यामनगर परिसरात असलेले स्त्री रुग्णालयात वर्षभरात होणाऱ्या सरासरी १७०० ते १८०० प्रसूतींची संख्या सध्या ३००० वर गेली आहे. रुग्णालयात तत्पर व दर्जेदार सेवा देण्यात येत असल्याने रुग्णांची व नातेवाईकांची ओढ या रुग्णालयाकडे वाढली आहे. एकंदरीत या रुग्णसेवेची दखल राज्य शासनाने घेतली असून सन २०२४-२५ चा राज्यस्तरीय कायाकल्प पुरस्कार या रुग्णालयात जाहीर झाला आहे. यासाठी तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निळकंठ भोसीकर, विद्यमान जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके, वैद्यकीय अधीक्षक डॉ. ललिता मनुरकर- सुस्कर, डॉ. सुनील पल्लेवाड, डॉ. मोहिनी पाटील, डॉ. राम मुसंडे डॉ. नंदिनी जाधव, डॉ. मधुकर हत्ते तसेच रुग्णालयातील सर्व वैद्यकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांनी तत्पर सेवा दिलेली आहे. त्यामुळेच हा पुरस्कार हा रुग्णालयास कायाकल्प पुरस्कार प्राप्त झाला अशा भावना डॉ.मनुरकर यांनी व्यक्त केल्या.

# महापालिकेच्यावतीने वसंतराव नाईक जयंती साजरी




**नांदेड (प्रतिनिधी)** – महानगरपालिकेतर्फे एक जुलै रोजी सकाळी ११ वाजता नागार्जूना पाईंट येथील वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळयास मनपाचे अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपआयुक्त अजितपालसिंग संधु, उपायुक्त सुप्रिया टवलारे, सहाय्यक आयुक्त मनिषा नरसाळे, क्षेत्रिय अधिकारी तथा उद्यान अधिक्षक डॉ. मिर्झा फरहतुल्ला बेग, क्षेत्रिय अधिकारी गौतम कवडे, राजेश जाधव, उद्यान सहाय्यक उल्हास महाबळे यांच्यासह मनपाचे कर्मचारी व शहरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# 'इस्कॉन'च्या श्री जगन्नाथ रथयात्रेत हरिनामाचा गजर

**नांदेड (प्रतिनिधी)** – आंतरराष्ट्रीय कृष्ण भावनामृत संघ (इस्कॉन) नांदेड तर्फे रविवार दि. २९ जून रोजी श्री जगन्नाथ रथयात्रा महामहोत्सव व हरिनाम संकीर्तन दिंडी काढण्यात आली. या दिंडीत हजारोच्या संख्येने भाविक भक्तांनी हरिनामाच्या गजरात रथ ओढत रथयात्रेत सहभाग घेतला. यावेळी विशेष अतिथी म्हणून आमदार आनंदराव बोंढारकर व माजी आमदार अमरनाथ राजुरकर यांनीही सहभाग घेतला.



'इस्कॉन' नांदेडचे प्रमुख प्रचारक अरविंद दास यांच्या हस्ते जुना मोंढा चौक येथून दुपारी एक वाजता श्री जगन्नाथ बलदेव सुभद्रामाई यांच्या अर्चाविग्रहाच्या महाआरतीने रथयात्रेस प्रारंभ करण्यात आला. ही रथयात्रा महावीर चौक, मारवाडी धर्मशाळा, एस. पी. ऑफीस चौक, तिरंगा चौक मार्गे हरिनाम संकीर्तन व महाप्रसाद वितरण करत भसिन मंगल कार्यालय गोवर्धन घाट येथे सायंकाळी सहा वाजता रथयात्रा पोहचली. त्यानंतर सायंकाळी सहा ते रात्री आठ वाजेपर्यंत कथा, कीर्तन, श्री जगन्नाथ अष्टकम, सांस्कृतिक कार्यक्रम, महाआरती व भव्य महाप्रसाद वितरणाचे कार्यक्रम घेण्यात आले. रथावर आरुढ श्री जगन्नाथ बलदेव सुभद्रामाई यांच्या दर्शनाने भाविक भक्तांना नव आध्यात्मिक चैतन्य प्राप्त झाले. जय जगन्नाथ व हरे कृष्ण महामंत्रां गजरात भाविक तल्लीन झाले होते.

या महोत्सवातील सत्संग कार्यक्रमासाठी प्रवचनकार म्हणून 'इस्कॉन' चौपाटी मुंबई येथील वरिष्ठ भक्त श्रीमान सत्यानंद प्रभू लाभले होते. भगवान श्रीकृष्णांचे विशेष रूप असलेले श्री जगन्नाथ भगवान यांच्या पाच विशेष कृपांचे-रथयात्रा, महाप्रसाद, जगन्नाथ यांचे नेत्र, त्यांचे सेवक व दिव्यालीला यांचे सुंदर कथन त्यांनी केले. चार धामांपैकी एक असलेल्या श्री जगन्नाथ पुरी येथील रथयात्रेचा लाभ भक्तांना त्यानिमित्त घेता आला.

रथयात्रेदरम्यान ठिकठिकाणी भक्तांना पाणी व महाप्रसाद वितरण व पुष्पवृष्टी करण्यात आली. वजीराबाद पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम, प्रवीण साले, दिलीपसिंग सोढी, राम जन्मोत्सव समितीचे गणेश ठाकूर, विश्व हिंदू परिषदेचे श्रीराज चक्रवार, अंबादास जोशी व विविध सामाजिक कार्यकर्ते यांनी देखील रथयात्रेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. रथयात्रेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल सर्वांनी 'इस्कॉन' नांदेडचे आभार मानले.

# पोलीस अधीक्षक कार्यालयात वसंतराव नाईक जयंती साजरी



**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील पोलीस अधीक्षक कार्यालयात मंगळवारी (दि.१) वसंतराव नाईक जयंती साजरी करण्यात आली. यावेळी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी पोलीस उपनिरीक्षक सुमित बनसोडे बासंबेकर यांच्यासह पोलीस अधीक्षक कार्यालयातील सर्व विभागाचे पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार यांनी वसंतराव नाईक या महापुरुषांना अभिवादन केले.

सदर कार्यक्रमाचे आयोजन ग्रेड पोलीस उपनिरीक्षक सुर्यभान कागणे, पोलीस कॉन्सटेबल मारोती कांबळे, विनोद भंडारे यांनी चांगल्या प्रकारे केले आहे.

# सिडको परिसरात 'संकल्प से सिध्दी'तर्फे कार्यशाळेचे आयोजन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– पंतप्रधान मोदी सरकारच्या विकास, सुशासन आणि गरिबांच्या कल्याणासाठी समर्पित सेवेच्या ११ वर्षांच्या स्मरणार्थ भाजपा सिडकोमंडळात 'संकल्प से सिद्धी तक' कार्यशाळा घेण्यात आली.

जनसंघाचे संस्थापक स्व. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. माजी अध्यक्ष प्रविण साले म्हणाले की, २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवीन भारत निर्माण करण्याचे वचन दिले होते आणि ११ वर्षांत त्या वचनांची पूर्तता झाली आहे. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तन प्रत्येक क्षेत्रात दिसून येत आहे. २०१४ पूर्वी आणि २०१४ नंतरच्या भारतामधील फरक स्पष्ट आहे, असे ते म्हणाले. प्रा.नंदू कुलकर्णी यांनी १९७५ च्या आणीबाणीच्या काळ्या वारशाबद्दलची माहिती सांगून २५ जून १९७५ रोजी काँग्रेसने दडपलेल्या लोकशाहीचे, निष्पापांना



तुरुंगात टाकून छळलेल्या काळ्या अध्यायाची माहिती दिली.

जनार्दन ठाकूर यांनी श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या कार्यावर प्रकाश टाकून ३७० कलम रद्द करण्यासाठीचे व एक देश, एक विधान, एक प्रधान व एक संविधान याचा उल्लेख केला. कार्यक्रमाच्या शेवटी अध्यक्षीय समारोप करताना भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष अमर राजूरकर यांनी भाजप संघर्षातून उभा राहिलेला पक्ष असून यामध्ये काम करणारे सर्व देशभक्त निःस्वार्थपणे आजपर्यंत कार्य करत आहेत, याचा मलाही भाजपात प्रवेश केल्यानंतर अनुभव आला. म्हणूनच भाजप हा देशभक्तांचा पक्ष असल्याचे नमूद केले.

यावेळी जनार्दन ठाकूर, प्रा.नंदू कुलकर्णी, प्रवीणभाऊ साले, डॉ. सचिन उमरेकर, शीतलभाऊ खांडील, शीतलताई भालके, सिडको मंडळाध्यक्ष सचिन रावका, धीरज स्वामी, सिद्धार्थ धूतराज यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाला अनिलसिंग हजारी, प्रभाकर पेटकर, डॉ.नरेश रायेवार, राज यादव, सौ. विजयाताई गोडघासे, भि. ना. गायकवाड, सतीश बसवदे, नीरज चव्हाण,नरेंद्रसिंह बैस, राजू आंबेकर, राजू लांडगे, प्रल्हाद टेहरे यांची उपस्थिती होती. सिडको मंडळ संयोजक धीरज स्वामी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर जिल्हा सहसंयोजक सिद्धार्थ धूतराज यांनी सूत्रसंचालन केले. सिडको मंडळाध्यक्ष सचिन रावका यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# मुदखेड पंचायत समितीत कृषि दिन साजरा



**मुदखेड (प्रतिनिधी)** – **येथील** पंचायत समितीत माजी मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांची जयंती कृषि दिन म्हणून साजरी करण्यात आली.

गटविकास अधिकारी .शेखर देशमुख हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. कृषि तज्ज्ञ डॉ. माणिकराव कल्याणकर, तालुका कृषि अधिकारी डॉ. अमरज्योती गच्चे, कृषि अधिकारी ज्योतिबा पवार, कृषि विस्तार अधिकारी एस. एम. पाटील यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी विविध योजनांचे लाभार्थी व कृषि सेवा केंद्र चालकांचा सत्कार करण्यात आला. विस्तार अधिकारी अरूण घोडसे यांनी सूत्रसंचालन तर विस्तार अधिकारी दत्तात्रय उपलंचवार यांनी आभार मानले.

या कार्यक्रमास पंचायत समितीतील अधिकारी, कर्मचारी व तालुक्यातील कृषि सेवा केंद्र चालक व शेतकरी उपस्थित होते.

# वसंतराव नाईक महाविद्यालयात कृषिदिनी वसंतराव नाईकांना अभिवादन

## वसंतराव नाईक हे मातीत कष्टणाऱ्या उपेक्षितांसाठी कार्य करणारे दृष्टे राजकारणी –प्रा. डॉ. नागराज मगरे

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– मातीत राबणाऱ्या माणसांसाठी काम करणाऱ्या दृष्ट्या राजकारण्यांमध्ये वसंतराव नाईक यांचे नाव अग्रभागी आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते प्रा. डॉ. नागराज मगरे यांनी केले.

येथील वसंतराव नाईक महाविद्यालयात हरित क्रांतीचे प्रणेते तथा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांची ११२ वी जयंती आणि कृषिदिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष कर्मयोगी डॉ. नानासाहेब जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शेखर



घुंगरवार हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध व्याख्याते डॉ. नागराज मगरे यांची उपस्थिती यावेळी उपस्थिती होती.

याप्रसंगी डॉ. मगरे यांनी वसंतराव नाईक यांच्या जीवन चरित्रावर भाष्य केले. 'वसंतराव नाईक यांची राजकीय दृष्टी' या विषयाच्या अनुषंगाने विचार व्यक्त केले. ते पुढे म्हणाले की, दिवंगत वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना रोजगार हमी योजना, कृषीविकास, औद्योगीकीकरण, भटक्या विमुक्तांसाठी निवासी आश्रमशाळा, महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात कृषीविद्यापीठांची स्थापना, वीजनिर्मिती प्रकल्पांना मंजुरी यासारख्या अनेक विकासात्मक धोरणांना त्यांनी गती दिली. म्हणूनच वसंतराव नाईक यांचे महाराष्ट्राच्या जडणघडणीत सर्वार्थाने मोलाचे योगदान आहे, असेही त्यांनी मत व्यक्त केले.

याप्रसंगी एस. बी. आय. बँकेचे सुरज यामिया, व्यंकट सत्यसाई नागेश्वरराव, प्रदीप सहारे, रजतकुमार, सोनकांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.डॉ. व्यंकटेश देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. तर मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. साहेबराव शिंदे यांनी आभार मानले. यावेळी महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्रो. डॉ. रेणुका मोरे, प्रो. डॉ. नागेश कांबळे, प्रा. डॉ. आर. एम. कागणे, डॉ. अनिल गच्चे, डॉ. दिलिप पालिमकर, डॉ. संतोष शिंदे, डॉ. गणेश लिंगमपल्ले, डॉ. संजय गिरे, आर. डी. राठोड, डॉ. उत्तम कानवटे, डॉ. साहेबराव मोरे, डॉ. विजयकुमार मोरे, प्रा. किशोर सुर्यवाड, प्रा. कविता हंबर्डे, पर्यवेक्षक प्रा. पी. बी. चव्हाण, प्रा. जायदे, प्रा. नंदिनी सुधळकर, प्रा. माधव मुस्तापुरे, प्रा. शेख, प्रा. कोतवाल, प्रा. कपील हिंगोले, प्रा. शशीकांत हाटकर, डॉ. लालबा खरात, डॉ. शोभा वाळुक्कर, डॉ. ललिता आय्या, प्रा.नितीन मुंडलोड, प्रा.भुमरे, डॉ. सरोदे, प्रा. राहुल पडोळे व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# दक्षिण भारत क्षेत्रासाठी मराठा सेवा संघाच्या १९ व २० जुलै दरम्यान केडर कॅम्पचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)**– मराठा सेवा संघाचे संस्थापक पुरुषोत्तम खेडेकर, राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार, महासचिव प्रदिप पाटील, राष्ट्रीय कार्याध्यक्ष सोपानमामा क्षीरसागर, तेलंगणा प्रदेश अध्यक्ष संतोष ठाकरे, राष्ट्रीय उपाध्यक्ष इंजि लिंबराजबप्पा सुर्यवंशी, सतिष मुळे, बालाजी बिरादार, राम वाडीकर, दत्ता दावणगावे पाटील, श्रीकांत बिरादार यांच्या पुढाकाराने मराठा सेवा संघाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीतील प्रमुख पदाधिकाऱ्यांसाठी दोन दिवसीय निवासी कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर १९ व २० जुलै दरम्यान घेण्यात येणार आहे. तेलंगणातील हैदराबाद येथे हे शिबीर घेण्यात येणार असून या शिबिरात आंध्रप्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू, केरळ आदी



दक्षिणेतील राज्यातील मराठा सेवा संघाचे पदाधिकारी सहभागी होणार आहेत.

मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय प्रशिक्षण प्रमुख शिवाजीराजे पाटील बाभळीकर, संत गाडगेबाबा प्रबोधन कक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. संभाजी नवघरे, जिजाऊ ब्रिगेडच्या राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. निर्मला पाटील यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. मराठा सेवा संघाच्या कार्यकर्त्यांनी या प्रशिक्षण शिबिराचा आवर्जून लाभ घ्यावा, असे आवाहन मराठा सेवा संघाच्यावतीने करण्यात आले आहे.

फॅशन | संसार | सौंदर्य
सखी

# पावसाळ्यात साडी नेसताय?

**पाऊस सध्या जोमात सुरू आहे. पावसाळा सुरू झाल्याने, उन्हापासून काहीसा दिलासा मिळाला आहे. पावसाळ्यात आपण स्वतःच्या राहणीमानावर विशेष लक्ष ठेवतो. पावसाळ्यात कपड्यांविषयी बोलायला गेलं तर, या सीझनमध्ये लोक पाश्चात्य पोशाख घालणे पसंत करतात. मात्र, या सीझनमध्ये खरं तर तुम्ही वेगवेगळे लुक्स ट्राय केले पाहिजेत. ज्यांना या सीझनमध्ये साड्यांची आवड आहे, तर त्यासाठी तुम्ही सुंदर साड्यांचाही लुक्स ट्राय करू शकता. या हंगामात तुम्ही तुमच्या साडी कलेक्शनमध्ये काही रंगीबेरंगी साड्या जोडू शकता. तर आज आम्ही तुमच्यासाठी काही टिप्स घेऊन आलो आहोत ज्याद्वारे तुम्ही पावसाळ्यात तुमच्या साड्यांच्या कलेक्शनमध्ये भर घालू शकता आणि स्वतःचा वेगळा लुक्स ट्राय करू शकता.**



- हॅप्पी शेड्स निवडा : आजकाल पेस्टल रंग ट्रेंडमध्ये आहेत, त्यामुळे जरी तुम्हाला हे रंग कितीही आवडत असले, तरीही पावसाळ्यात तुम्ही ते खरेदी करणं टाळले पाहिजे. या काळात तुम्ही गडद आणि आनंदी रंग निवडू शकता. जसे की, गुलाबी, केशरी, पिवळा, गंज, जांभळा, मरून हे रंग पावसाळ्यात उठून दिसतील. तसंच तुमचा वेगळा लुक्स सुद्धा दिसून येईल.
- वेगळी स्टाईल करा : सध्या धोती साडी, रेडी टू वियरचा जमाना आहे. या जमान्यात तुम्ही, नेहमीच्या पद्धतीने साडी नेसण्यापेक्षा या नवीन ट्रेंड प्रमाणे साडी नेसावी. आजकाल बॉलिवूड सिलेब्रिटी जेगिंग्ज किंवा जीन्ससह साडी नेसतात. तर तुम्ही देखील अशावेळी स्टायलिश दिसण्यासाठी या पद्धतीचे ट्रेंड प्रमाणे साडी नेसू शकता आणि तुमच्या साडीला अशा प्रकारे स्टाइलही करू शकता.
- प्रिंट्सची योग्य निवड करा : या ऋतूत फ्लॉवर डिझाइन्स छान दिसतात. तुम्ही या प्रकारचे डिझाईन कॅरी करू शकता. जर तुम्ही पावसाळ्यात एखादी साडी खरेदी करायचा विचार करत असाल, तर फ्लॉवर डिझाइन्सच्या साड्या खरेदी करण्यात विशेष भर द्या. असले डिझाइन्स उठून देखील दिसतील आणि वेगळा लुक्स देखील तयार होईल.
- योग्य फॅब्रिक खरेदी करा : साडी खरेदी करताना फॅब्रिकच्या निवडीकडे लक्ष द्या. पावसाळ्यासाठी शिफॉन, पॉली जॉर्जेट आणि जॉर्जेट चांगले मानले जातात. ते तुमच्या त्वचेवर हलके असतात. त्यामुळे अशा सध्या या ऋतूत खरेदी करा. पावसाळ्यात कॉटनच्या साड्या घालणे टाळा. त्या पावसाळ्यात नीट दिसतही नाहीत, तसंच त्या या ऋतूत लवकर सुकतही नाहीत.

# पावसाळी फॅशनची तारांबळ!



**फॅशन मेरे बस की बात नहीं, मी काय फॅशन करत नाही असं कितीही म्हटलं तरी प्रत्येक जण फॅशन करतच असतो. रोज बाहेर पडताना तुम्ही आज कोणते कपडे घालावे, या शर्टवर ही पॅण्ट छान दिसेल का किंवा यात मी जाड तर दिसत नाहीये ना असा विचार तर नक्कीच करता. म्हणजेच काय तर तुम्ही फॅशन करता, फॅशनचा विचार करता. प्रत्येक ऋतूनुसार आपली फॅशन बदलत असते किंवा ती बदलावीच लागते. अगदी ट्रेण्डिंग कपडे वगैरे तुम्ही घालत नसाल तरी कोणत्या ऋतूमध्ये कोणते कपडे घालावेत याचा विचार करावा लागतो. उन्हाळ्यात आणि हिवाळ्यात आपण जेवढा कपड्यांचा, फॅशनचा विचार करत नाही तेवढा जास्त पावसाळ्यात करावा लागतो. कारण तो विचार जर नाही केला तर आपली फॅशनेबल तारांबळ नक्कीच उडते...**

पाऊस आणि फॅशन हे समीकरण जुळवून आणणं फार महत्त्वाचं असतं. कारण पावसाळ्यात आपण जरा जरी चुकलो की झालंच.. आपल्या फॅशनचे तीनतेरा वाजतात. आपण पाऊस आणि फॅशन या समीकरणाची सुरुवात खरेदीपासून करू. आधी म्हटल्याप्रमाणे ऋतू बदलतात तशी फॅशन बदलते. साहजिकच हा बदल बाजारातही दिसून येतो. नवीन ऋतू, नवीन कलेक्शन. पण जसा एखादा ऋतू संपून पुढच्या ऋतूची चाहूल लागते तसे वेगवेगळे सेलही सुरू होतात. या सेलमधला एक प्रकार म्हणजे 'स्टॉक क्लिअरन्स सेल'. लास्ट कलेक्शनमध्ये उरलेले कपडे त्यांना विकायचे असतात, कारण बाजारात नवीन कलेक्शन आणायचं असतं. अशावेळी आपण भरघोस सवलत आहे म्हणून भरपूर खरेदी करतो. पण आपण हे विसरतो की त्या सेलमध्ये असणारे कपडे किंवा ॲक्सेसरीज या आताच्या ऋतूमधे वापरताच येणार नसतात. अनेकदा सेलमध्ये घेतलेल्या गोष्टी या पुढच्यावेळी ट्रेण्डमध्ये असतीलच याची खात्रीही नसते. त्यामुळे पाऊस आणि या सेलमधील खरेदी थोडी विचारपूर्वकच करा. पावसाळी खरेदी म्हणजे स्वतचा पावसापासून बचाव करण्यासाठी लागणाऱ्या गोष्टी असा समज असतो. पण ही पावसाळी खरेदी फक्त तेवढ्यापुरतीच नसते. आपल्याला आपल्या रोजच्या कपडय़ांचीही खरेदी विचारपूर्वक करायला हवी. उन्हाळ्यात जसे आपण कॉटनचे कपडे घालतो तसे पावसाळ्यातही कॉटनचे कपडे घालायला काहीच हरकत नाही. कारण कॉटनचे कपडे लवकर सुकतात. पण १०० टक्के कॉटनचे कपडे मात्र चुकूनही घेऊ नका. कॉटन आणि दुसरं कापड एकत्र असणारे कपडे घ्या. कारण कॉटन पटकन सुकत असलं तरी त्यानंतर मात्र त्याचा वास येतो आणि ते अंगातून पटकन निघतही नाही. त्यामध्ये दुसरं कापड ब्लेण्ड केलेलं असेल तर तसा कमी वास येतो आणि अंगातून पटकन निघतं. या सोबतच आपण पावसाळ्यात चुकून जरी पारदर्शक कपडे वापरले तर भलतीच तारांबळ उडते. कारण अशा कपड्यांमधून आपलं अंतर्वस्त्र, अंग दिसतं आणि हे असं दिसणं आपल्याला कोणत्याही ठिकाणी लाज आणतं. त्यामुळे पावसाळ्यासाठी खरेदी करताना गडद रंगाचे आणि पारदर्शक नसलेले कपडे विकत घ्या. पावसाळ्यात पॉलिस्टर, नायलॉनचे कपडे घालावेत असं सांगितलं जाई. पण हेच कपडे जास्त पारदर्शक असतात, त्यामुळे तसे कपडे घेताना नीट लक्ष द्या. पावसाळा आला की नवनवीन, रंगीबेरंगी, फॅशनेबल रेनकोट, चप्पल, छत्र्या बाजारात येतात. पण प्रत्येक छत्री, रेनकोट हे फॅशनसोबतच आपली गरजही पूर्ण करेल असं होत नाही. उंचीला मोठय़ा असणाऱ्या, रंगीबेरंगी, सुंदर पिंट्र असणाऱ्या छत्र्या मुली खरेदी करतात. त्या उंच दिसत असल्या तरी त्या उघडल्यावर मोठ्या नसतात. छत्रीप्रमाणे रेनकोट घेतानाही आपण काही चुका करतो. रंग, डिझाइन आणि फिटिंग छान आहे म्हणून आपण रेनकोट लगेच



विकत घेतो. पण रेनकोट घेताना या सगळ्या गोष्टीसोबत रेनकोटचं कापड बरोबर आहे ना, त्यावरून पाणी ओघळून जाईल ना, त्याच्या सगळ्या चेनची नीट उघडझाप होत आहेत ना, या सगळ्या गोष्टी बघणं गरजेचं असतं. रेनकोट शक्यतो दुकानातूनच खरेदी करा. त्याची खरेदी रस्त्यावर नकोच. पावसाळ्यात चपलांची ग्रीप नीट असणं अति महत्त्वाचं असतं नाही तर आहेच भर रस्त्यात आपला कपाळमोक्ष. कापडाचे बूट तर सुकता सुकत नाहीत आणि त्यांची दुर्गंधी तर वेगळीच. पावसाळ्यात चामड्याचे बूट किंवा चप्पल वापरली तर ती आपल्याला परत वापरण्यायोग्य राहत नाही. त्यामुळे पावसाळ्यात बाजारात आलेले प्लास्टिकचे शूज, चप्पलच वापरा. पावसाळी फुटवेअरची खरेदी दुकानातूनच करावी असं काहीही नाही. रस्त्यावर घेतलेले फुटवेअरही छान टिकतात. पावसाळ्यात घालायच्या दागिन्यांची निवडही नीट करावी. नाही तर दागिन्यांचा रंग जाणं, ते दागिने अंगाला लागून त्वचेला त्रास होणं असे प्रकार होतात. त्यामुळे पावसाळ्यात कमीत कमी दागिने घाला. वॉटरप्रूफ, चांगला दर्जा असलेले दागिने घाला. सध्या चंकी दागिने जास्त ट्रेण्डिंग आहेत आणि ते पाण्याने खराबही होत नाहीत.

# टिप्स मान्सून मेकअपच्या...

**मेक-अप करताना काय काळजी घ्यायची, सौंदर्यप्रसाधनं कोणती वापरायची, मेक-अप बेस कसा असावा, आधी काय लावायचं, कसं लावायचं अशा अनेक शंका मनात असतात. त्यांचं समाधान करणारा लेख...**

- स्वच्छ आणि निरोगी त्वचा : दमट वातावरणामुळे त्वचेवर मुरूम येण्याचा अधिक संभव असतो. त्यासाठी दिवसातून तीन-चार वेळा चेहरा थंड पाण्याने धुऊन वॉटर बेस्ड मॉइश्चराइजर लावा. जेणेकरून घाम येण्याचे प्रमाण कमी होईल. हेच प्रमाण अजून कमी करण्यासाठी बर्फाने चेहऱ्याला ५ ते १० मिनिटे मसाज करा. यामुळे त्वचा तजेलदारही होईल तसेच मेकअप जास्त काळ




टिकून राहील.
- फाउंडेशन : पावसाळ्यात फाउंडेशन टाळलेलेच बरे. पाण्याने किंवा घामाने चेहरा ओला झाल्यास चेहऱ्यावर पॅचेस येतात. म्हणून मेकअप बेस तयर करण्याकरिता लूज पावडरच वापरा.
- ब्लशर : कोऱ्या चेहऱ्याला ब्लशरने नक्कीच गेटअप येईल. ब्लशरची शेड निवडताना तुमच्या चेहऱ्याला व्यवस्थित ब्लेंड होईल असाच निवडा. क्रिमी किंवा स्पार्कल असलेले ब्लशर वापरू नका.
- लिपस्टिक : पावसाळ्यात ओठांचा मेकअप थोडासा डल पण मोहक वाटणारा असावा. भडकपणा येणार नाही याची काळजी घ्या. त्यासाठी पारदर्शक लिप ग्लॉस वापरा. लूक टिकवून ठेवण्यासाठी तो दिवसातून अनेक वेळा लावला तरी चालेल. ग्लॉसी लिपस्टिकपेक्षा मॅटला प्राधान्य द्या. पिक आणि ब्राउनच्या विविध शेड्सची निवड करू शकता. तुम्ही लिप लायनरचाही वापर करू शकता. फक्त ते वॉटरप्रूफ आहे याची खात्री करून घ्या. नाहीतर पावसाचे थेंब पडताच ते पुसले जाईल.
- भुवया : भुवया नेहमी व्यवस्थित कोरलेल्या असू द्याव्यात. तसेच त्या क्लियर किंवा टिन्टेड जेलनी सेट कराव्यात. आय ब्रो पेन्सिलचा वापर करू नये.

## डोळ्यांचा मेकअप

पावसाळ्यात डोळ्यांचा मेकअप करत असताना विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. कारण खूप वेळ खर्च करून तुम्ही आयशॉडो, मस्कारा, लाइनर लावत असतात आणि पावसाचे काही थेंब पडताच पूर्ण मेक अप खराब होतो. मेकअप खराब होण्याचे आणखी एक कारण म्हणजे दमट हवा. आय लाइनरपेक्षा कोहल वापरा. कारण तुलनेने कोहलची पाण्याला प्रतिकार करण्याची क्षमता जास्त काळ असते. पावडर आय शॅडोमध्ये टरक्वाइस, ब्राउन, ब्ल्यू, ग्रीन आणी पिक शेड्सची निवड करा. वॉटरप्रूफ मस्काऱ्याचे एक किंवा दोन कोट्स द्या.

## हे लक्षात घ्या...

चेहऱ्यावर फाउंडेशन वापरणे शक्यतो टाळावे. त्याऐवजी तुम्ही कोणतीही फेस पावडर वापरू शकता. फेस पावडर वापरताना, त्याचे प्रमाण आवश्यक तेवढेच ठेवावे याची विशेष काळजी घ्यावी लागेल. ब्लशिंगसाठी, पावडरऐवजी क्रीम ब्लशर वापरणे चांगले. त्याचा वापरही जपून करावा. याशिवाय जेव्हाही तुम्ही पावसात भिजता तेव्हा पूर्ण चेहरा रुमालाने जोरात पुसण्याऐवजी हलकेच पुसावा. आयशॅडोसाठी हलके रंग वापरणे चांगले. यासाठी पावडरऐवजी क्रीम वापरा जेणेकरून ओले झाल्यावर ते पसरून चेहऱ्यावर येणार नाही. पावसाळ्यात मेकअप करताना मस्करा टाळावा. याशिवाय पेन्सिल लाइनर आणि त्यानंतर लिक्विड आयलायनर डोळ्यांच्या मेकअपसाठी अधिक योग्य आहे. यामुळे तुम्ही पावसात भिजलात तरी ते तुमच्या चेहऱ्यावर पसरण्याचा धोका नाही.



## या गोष्टी टाळाव्यात...

- क्रीम बेस्ड कॉस्मेटिक्स : उदाहरणार्थ फाउंडेशन, प्रायमर किंवा आयशॉडो. क्रीम बेस्ड कॉस्मेटिक्सने जास्त घाम येतो त्यामुळे मेकअप वितळण्याची शक्यता असते.
- ग्लॉस आणि स्पार्कल्स : जास्तीच्या ग्लॉस आणि स्पार्कल्सच्या वापराने मेकअपचा अतिरेक केला आहे असे वाटते.
- लिप ग्लॉस : लिपस्टिकवरती डिप लिप ग्लॉस लावल्यास ओठ जास्त चिकट होतील तसेच तुम्हाला अस्वस्थही वाटेल.

# पावसाळ्यात डेनिमने मिळवा स्मार्ट लूक

**वेगवेगळे स्टायलिश लूक करायला प्रत्येकाला आवडत. आपण प्रत्येक लूक मध्ये सुंदर दिसावं हे प्रत्येकाला वाटतं असत. कपड्यांमध्ये अनेक प्रकार आहे. मात्र, डेनिमचा ट्रेंड सध्या चांगला चाललाय. अनेकजण डेनिमप्रेमी आहेत. डेनिमची जीन्स, स्कर्ट, जॅकेट यांसारख्या गोष्टी वापरणं अनेकांना आवडतं. मात्र, तुम्ही देखील डेनिम प्रेमी असाल, त्यामध्ये देखील असलेले नवीन स्टायलिश लूक तुम्हाला माहीत असणं गरजेचं आहे. डेनिममध्ये देखील अनेक नवीन असे पॅटर्न आले आहेत की जे तुम्ही नक्की ट्राय केले पाहिजेत. चला तर मग जाणून घेऊया डेनिमचे काही स्टायलिश लूक. जे वापरून तुम्ही वेगळा लूक तयार करू शकता.**

- मस्त रंग : जर तुम्हाला काळा, निळा, पांढरा याशिवाय इतर रंग वापरायचे असतील तर तुम्हाला डेनिममध्ये अनेक रंग मिळतील. क्रिम केशरी, हिरवा, पिवळा रंग तुमची शैली आणखी वाढवेल. याशिवाय प्रिंटेड डेनिम ट्राउझर्सही तुम्हाला सहज मिळतील. या नवीन स्टाइल्स वापरून तुमचा चांगला स्टायलिश लूक बनेल.
- फ्लेर्ड डेनिम्स : सर्वच ऋतूंसाठी हे रुंद पायांचे सिल्हूट एक उत्तम पर्याय आहे. लांब हेमलाइनवर तुम्ही एखादा चांगला क्रॉप टॉप, हॉल्टर टॉप किंवा व्ही-नेक टीसह रुंद-लेग पँट घालू शकता. हा तुम्हाला दररोज पेक्षा एक चांगला लूक देईल. तसंच तुम्ही इतरांपेक्षा एक वेगळा लूक तयार करू शकता.
- डार्क वॉश : डार्क वॉश ही स्टाईल १९९० च्या दशकात खूप लोकप्रिय झाली होती. आता पुन्हा २०२२ च्या उन्हाळ्यात गडद इंडिगो डेनिम पुन्हा दिसू लागले आहे. जर तुम्ही हा पॅटर्न याआधी कधी वापरला नसेल, तर या वर्षी नक्की करून पहा. तुम्हाला यामध्ये एक चांगला लूक मिळेल. तसंच तुम्ही या डार्क वॉश मध्ये खूप उठून दिसाल.
- डेनिम मॅक्सी स्कर्ट : डेनिम मॅक्सी स्कर्ट हा तुम्हाला वेगळा लुक देण्यासाठी पुरेसा आहे. हा स्कर्ट स्नीकर्ससोबत घालता येतो, पण जर तुमची उंची चांगली असेल तर ती फ्लॅट फूटवेअरसोबतही घालता येते. दररोजच्या लुक्समध्ये जर तुम्ही कंटाळलात असाल, तर हा डेनिमचा नवीन स्टायलिश लूक तुम्हाला एक हटके लूक देईल.
- डेनिम जॅकेट : कोणत्याही साध्या ड्रेसला स्टायलिश बनवण्यासाठी डेनिम जॅकेटही पुरेसे आहे. डेनिम जॅकेटसह तुम्ही मॅक्सी ड्रेस किंवा टॉप स्टाइल करू शकता. पावसाळ्याच्या दिवसात किंवा हलक्या हिवाळ्यातही ही शैली खूपच आरामदायक दिसते. डेनिम जॅकेट तुम्ही एखाद्या जीन्सवर देखील घालू शकता. यामुळे देखील तुम्हाला एक चांगला लूक मिळेल.

# मान्सूनमध्ये भारी लूक देणाऱ्या लिप्स शेड्स!

**पावसाळ्यात आर्द्रता जास्त असल्याने खूप घाम येतो. अशा परिस्थितीत जास्त मेकअप केल्यास सुंदर दिसण्याऐवजी तुमचा लूक खराब करू शकतो. पावसाळ्यात हलका मेकअप करणे जास्त चांगले आहे आणि काही विशेष प्रकारच्या लिपस्टीक तुमच्या मेकअप किटमध्ये ठेवू शकता. आज आम्ही तुम्हाला अशा लिप्स शेड्स बाबत सांगणार आहोत ज्या वापरून तुम्ही पावसाळ्यातही तुमचा लूक चांगला दिसेल...**



- बेरी टोन : पावसाळ्यात बेरीच्या वेगवेगळ्या शेड्स जसे की डीप रेड, प्लम किंवा क्रॅनबेरी असे रंग निवडा. हे शेड्स जवळजवळ प्रत्येक त्वचेच्या टोनला सूट देतात आणि तुमचा लूक सुधारण्यासाठी मदत करतात.
- रोज पिंक : सॉफ्ट रोज पिंक शेड्स तुम्हाला सुंदर दिसण्यासोबतच तरुण दिसण्यासाठी देखील मदत करतात. ते ओठांना नॅचरल लूक देतात, सर्वात चांगली गोष्ट म्हणजे तुम्ही त्यांना कॅज्युअल आणि फॉर्मल लूकमध्ये वापरू शकता.
- कोरल शेड : चमकदार कोरल शेड्स पावसाळ्याच्या दिवसामध्ये हटके लूक देण्यासाठी मदत करतात. या रंगामुळे तुम्ही तुमच्या वास्तविक वयापेक्षा तरुण दिसता आणि तुमचे सौंदर्य वाढवता.
- न्यूड शेड्स : जर तुम्हाला गडद लिपस्टिक वापरणे आवडत नसेल तर तुम्ही न्यूड शेड्स निवडू शकता. न्यूड शेड्सही प्रत्येक आउटफिटसोबत वापरता येतात.
- मोव्ह शेड : गुलाबी आणि जांभळ्या रंगाची शेड असलेली लिपस्टिक ही एक दिवसभरच्या लूकसाठी योग्य पर्याय आहे. बरं, तुम्ही रात्रीच्या पार्टीसाठी किंवा लग्नासाठी या शेड्स वापरून पाहू शकता.

# महिला व बालविकास विभागाने योजनांची अंमलबजावणी करताना मानवी दृष्टिकोन ठेवावा -राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन



**मुंबई–** देश जगातील अग्रणी अर्थव्यवस्था होण्याकडे वाटचाल करीत असताना महिला व मुलांची स्थिती सुधारली नाही तर केवळ आर्थिक प्रगतीला महत्त्व राहणार नाही असे सांगून महिला व बालविकास विभागाने आपल्या योजनांची अंमलबजावणी करताना आपुलकीची भावना व मानवी दृष्टिकोन ठेवावा तसेच अधिकाऱ्यांनी सांघिक भावनेने कार्य करावे, अशी सूचना राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केली.

राज्यपाल राधाकृष्णन यांनी महिला व बालविकास विभागाच्या विविध योजनांचा विशेषत: 'वन स्टॉप सेंटर' व 'मिशन शक्ती' या योजनांचा राजभवन येथे आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते.

बैठकीला महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, विभागाचे सचिव डॉ. अनुप कुमार यादव, महिला व बालविकास आयुक्त नयना गुंडे, उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर, आयसीडीएसचे आयुक्त कैलास पगारे तसेच महिला व बालविकास विभागाचे इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

महिला व बालविकास विभागाकडे समाजातील महिला, बालके व विशेषतः निराधार अनाथ मुलांच्या विकासाची महत्त्वाची जबाबदारी आहे असे सांगून आदिवासी मुला-मुलींमधील शिक्षण मध्येच सोडण्याचे प्रमाण कमी करण्याकरिता विशेष प्रयत्न झाले पाहिजे असे राज्यपालांनी यावेळी सांगितले.

आदिवासी विद्यार्थ्यांना विद्यापीठांमध्ये शिक्षण, निवास, भोजन आदी सुविधा मोफत उपलब्ध आहेत याची माहिती दिली गेल्यास त्यांचे उच्च शिक्षणातील प्रमाण वाढेल. अनाथ मुलांसाठी शासकीय सेवेत आरक्षण ठेवण्याचा महाराष्ट्र शासनाचा निर्णय क्रांतिकारी आहे. विविध योजनांची अंमलबजावणी प्रभावी होत आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी मंत्री तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गावांना भेटी दिल्या पाहिजे, लाभार्थ्यांना भेटले पाहिजे तसेच गाव पातळीवरील प्रत्यक्ष अडचणी जाणून घेतल्या पाहिजे, असे राज्यपालांनी सांगितले. यावेळी राज्यपालांनी लखपती दिदी योजनेबाबत राज्यातील प्रगतीची माहिती घेतली.

महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी विभागाच्या विविध योजनांची माहिती दिली. सचिव डॉ. अनुप कुमार यादव यांनी आपल्या सादरीकरणात विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या महत्त्वाच्या केंद्रीय व राज्यस्तरीय योजनांची माहिती दिली. मुख्य कार्यकारी अधिकारी 'उमेद' निलेश सागर यांनी देखील यावेळी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाबाबत सादरीकरण केले. बैठकीला राज्यपालांचे सचिव डॉ प्रशांत नारनवरे व उपसचिव एस. राममूर्ती हे देखील उपस्थित होते.

# वीज पडण्याची पूर्वसूचना देणारे नवीन प विकसित करणार -आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन

**मुंबई–** राज्यात वीज पडून होणारे मृत्यू टाळण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेण्यात येत आहे. सध्या ४० किलोमीटर परिघात वीज पडण्याची पूर्वसूचना दामिनी व सचेत पद्वारे दिले जात आहे. कमी परिघात वीज पडण्याची पूर्वसूचना देणारे नवीन प विकसित करण्यात येईल, अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासाच्यावेळी दिली.

या संदर्भात सदस्य समीर कुणावर यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य भास्कर जाधव, संतोष दानवे आणि विजय वडेट्टीवार यांनी सहभाग घेतला.

आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन म्हणाले, राज्यात पावसाळी वातावरणात वीज पडून होणाऱ्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असून, शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांना याचा सर्वाधिक धोका होत आहे. मुसळधार पावसाबरोबरच वीज कोसळणे आणि वादळी परिस्थिती उद्भवते, यावेळी शेतीकाम करत असताना अनेक वेळा शेतकरी वीज पडण्याच्या दुर्घटनांत बळी पडतात.

वीज पडण्याची पूर्वसूचना अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहचून जीवित हानी टाळता यावी, यासाठी भारतीय उष्णदेशीय मौसम विज्ञान संस्थेने (खखढच्) विकसित केलेली 'दामिनी' आणि 'सचेत' ही दोन प्स नागरिकांना वीज पडण्याच्या आधीच ४० किलोमीटर परिघात सावध करणाऱ्या सूचना देतात. शासनाच्या विविध विभागांतर्फे या प्सचा प्रचार व प्रसार सातत्याने केला जात असल्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री श्री. महाजन यांनी सांगितले.

राज्यात सन २०२२ मध्ये राज्यात वीज पडून २३६ व्यक्तींचा, तर २०२३ मध्ये १८१ व्यक्तींचा मृत्यू झाला असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी यावेळी दिली.

वीज पडून होणाऱ्या मृत्यूंच्या प्रकरणांत आपत्ती मदतीच्या निकषांनुसार शासनाकडून आर्थिक सहाय्यही दिले जाते. २०१७ नंतर वीज पडून मृत्यू झाल्यास कुटुंबियांना ४ लाखांची मदत, गंभीर जखमी व्यक्तीस २.५ लाखांची मदत, तर जनावरांच्या नुकसानीसाठी गाय/म्हैस/बैल यांना ३७ हजार ५००, मेंढी-शेळीसाठी ४०००, आणि कोंबडीसाठी १०० रुपये अशी भरपाई शासनाकडून दिली जात आहे. ही मदत वाढविण्याबाबत शासन सकारात्मक असल्याचेही त्यांनी सांगितले.

# राज्यातील विनाअनुदानित शाळांना टप्प्याटप्प्याने अनुदान -उपमुख्यमंत्री शिंदे

**मुंबई (प्रतिनिधी) –** राज्यातील विनाअनुदानित शाळांना टप्प्याटप्प्याने अनुदान देण्याच्या निर्णयावर शासन ठाम असून, संबंधित शाळांनी विहित नियमांची पूर्तता केली असल्यास त्यांना लवकरच पुढील टप्प्याचे अनुदान देण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेत दिली.

विधानपरिषद सदस्य किरण सरनाईक यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, राज्यात पूर्वी अनेक शाळांना कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्यात आली होती. मात्र, २००९ नंतर 'कायम' शब्द काढून टाकत टप्प्याटप्प्याने या शाळांना अनुदान देण्याचा मार्ग स्वीकारण्यात आला. २०१६, २०१८ आणि नंतर २०२३ पर्यंत अनेक शाळांना अनुदान दिले गेले असून, आता पुढील टप्प्यातील शाळांसाठी १० ऑक्टोबर २०२४ रोजी बैठक घेण्यात आली आणि १४ ऑक्टोबर २०२४ रोजी याबाबतचा शासन निर्णयही काढण्यात आला असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, शाळांना एकाच वेळी संपूर्ण अनुदान देणे शक्य नसले, तरीही टप्प्याटप्प्याने अनुदान देण्याचे काम निश्चितपणे पूर्ण करू. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि संबंधित विभागामध्ये चर्चा करून याबाबतचा लवकरच निर्णय घेतला जाईल, असेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

राज्यमंत्री पंकज भोयर म्हणाले की, अनुदानाचा पुढील टप्पा देण्यास शासन कटीबद्ध असून त्यासाठी लवकरच आर्थिक तरतूद करण्यात येईल.

यावेळी झालेल्या चर्चेमध्ये सदस्य किशोर दराडे, ज. मो. अभ्यंकर, जयंत आसगावकर, राजेश राठोड यांनी सहभाग घेतला.

# राजर्षी शाहू महाराज सन्मान योजनेसाठी ३१ जुलैपर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**मुंबई–** राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या राजर्षी शाहू महाराज जेष्ठ साहित्यिक व कलाकार सन्मान योजनेंतर्गत कला व साहित्य क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या १०० ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांना प्रति महिना पाच हजार रुपये मानधन देण्यात येते. या योजनेसाठी पात्र असलेल्या सर्व ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांनी आपले सरकार' पोर्टलवर ३१ जुलैपूर्वी अर्ज दाखल करावा, असे आवाहन संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

योजनेसाठी लाभार्थ्यांचे वय ५० वर्षांपेक्षा अधिक असावे आणि दिव्यांग कलाकारांसाठी वयोमर्यादा ४० वर्षे करण्यात आली आहे. कला किंवा साहित्य क्षेत्रात किमान १५ वर्षांचे योगदान आवश्यक आहे. विधवा, परितक्त्या, दिव्यांग व वयोवृद्ध कलाकारांना प्राधान्य दिले जाणार आहे. लाभार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न ६० हजार रुपयांपेक्षा जास्त नसावे. ज्यांची उपजीविका केवळ कलेवर अवलंबून आहे, अशा कलाकारांनाच प्राधान्य देण्यात येईल. लाभार्थी राज्य शासन किंवा केंद्र शासनाच्या कोणत्याही नियमित पेन्शन योजनेचा लाभार्थी नसावा. तसेच, महाराष्ट्राचा कायम स्वरूपी रहिवासी असणे आवश्यक असणे या पात्रतेच्या अटी आहेत.

योजनेचा लाभ घेण्यासाठी आपले सरकार पोर्टलवर https://aaplesarkar.mahaonline.gov.in/en ऑनलाईन अर्ज करता येणार आहे.

अर्जदाराने अर्जासोबत वयाचा दाखला, आधार कार्ड, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, प्रतिज्ञापत्र, पती-पत्नी एकत्रित छायाचित्र (लागू असल्यास), बँक पासबुकची प्रत. अपंगत्व प्रमाणपत्र (लागू असल्यास), शासनाचे इतर प्रमाणपत्रे (लागू असल्यास), नामांकित संस्था किंवा व्यक्तीकडून शिफारसपत्र (लागू असल्यास) ही आवश्यक कागदपत्रे जोडावीत, असेही प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.


## टी.सी.हरवली

मी कुरेशी सोहेल मसूद रा. देगलूर ता. देगलूर येथील रहाणारा असून माझी ७ वी पास ची (स.न २०१६) टि.सी देगलूर - उदगीर बस ने प्रवास करताना हरवली आहे. तरी कोणास सापडल्यास खालील पत्यांवर संपर्क साधावा.

**-संपर्क पत्ता-**
**कुरेशी सोहेल मसूद**
**रा. देगलूर, जि. नांदेड**
**मो. ९१११२९२३१४५**

## टी.सी.हरवली

माझी शेख शारूफ महेताब या नावाची ग्रामीण पॉलिटेक्निक कॉलेज विष्णु-पुरी नांदेड येथील डिप्लोमा चौथे सेमिस्टरची मूळ टी. सी. कंधार ते नांदेड दरम्यान प्रवासात हरवली आहे. ज्यांना कोणाला सापडली असेल त्यांनी कृपया खालील पत्यावर संपर्क साधावा. **संपर्क पत्ता-**

**शेख शारूफ महेताब**
**रा. बोळका, ता. कंधार**
**जि. नांदेड**

## टी.सी.हरवली

माझी शिवाजी माध-वराव धोंडगे या नावाची इयत्ता १२ वी नापासची टी. सी. शेंबोली ते बारड दरम्यान प्रवासात हरवली आहे. ज्यांना कोणाला सापडली असेल त्यांनी कृपया खालील पत्यावर संपर्क साधावा.

**-संपर्क पत्ता-**
**शिवाजी माधवराव धोंडगे**
**रा. शेंबोली, ता. मुदखेड,**
**जि. नांदेड**
**मो. ९८८१७७३०१७**

## टी.सी.हरवली

माझी सायमा तलत सय्यद सरदार हुसेन या नावाची इयत्ता १२ वी पासची टी. सी. हिंगोली गेट ते देगलूर नाका दरम्यान प्रवासात हरवली आहे. ज्यांना कोणाला सापडली असेल त्यांनी कृपया खालील पत्यावर संपर्क साधावा.

**-संपर्क पत्ता-**
**सायमा तलत**
**सय्यद सरदार हुसेन**
**मो. ७०२०२६८२५२**

## Wanted

Applications are Invited for the post of Perspectives in Education,Pedagogogy Subjects,Health &Physical Education and Performing Arts to be filled in Jai Jawan Jai Kisan Shikshan Prasark Mandal Kandhar& s sanchalit Swami Ramanand Teerth College Of Education (B.Ed) (Permanent Non Granted).Eilgible Candidates Should Submit their application along with all necessary Documents within 15 Days from Date of publication of this advertisement by registered post only.

| Sr.No | Position | No. of Posts | Nature | Reservation |
|---|---|---|---|---|
| 1 | Perspective in Education | 11 | Regular | Open 04<br>VJ (A) 01<br>NT (B) 01<br>OBC, 03<br>EWS- 01<br>SEBC- 01 |
| 2 | Pedagogy Subject (Math, Science, SocialScience, Language) | | | NOT.<br>We are Strictly followed the guidelines of govrnment vacancy postillup under co lateral Resrvation |
| 3 | Health & Physical Education | | | |
| 4 | Perfoming Arts(music/ Dance/theatre) Fine Art | | | Qouta<br>1) Wonan - 04<br>2) Handicapped 01<br>3) Sports -01 |

Qualification :-As Per UGC & NCT (2014 Rule)
the faculty shall Possess the following qualfication.
A) Prespectives in Education of foundation Courses.
i) Post Graduate degree in Social Science with minimum 55 % marks
ii) M.Ed.degree form a recognized university with minimum 55 % marks
OR
i) Postgraduate (M.A)Degree in Education with minimum 55 %
ii) B.Ed./B.El.Ed.Degree minimum 55 % marks
iii) SET/NET/Ph.D.in Education.
B) Currculm and Pedagogic Courses.
i) Postgraduate Degreein Sciences/Mathematics/Social Sciences/Languages With Minimum 55 %
ii) M.Ed.Degree with Minimum 55 %
iii) SET/NET/Ph.D.in Education
C) Health & Physical Education
i) Master of Physical Education(M.P.Ed) minimum 55 % marks
ii) SET/NET/Ph.D.in Physical Education.
D) Perfoming Arts graduate Degree in Fine Arts (MFA)with minimum 55 % marks
OR
i) Post graduate Degree in Music /Dance/ Thatre Arts minimum 55 % marks
ii) SET/NET/Ph.D.in fine Arts.

Salary and Allowance pay:- Scale as per UGC State Government & Swami Ramanand Teerth Marathwad Unvrsity.Nanded rules
From to time

NOTE :- 1. Prescribe application form is available on the University Website : (srtmun.ac in) 2. NO.T.A/D.A.wil be Paid to arrend the interviw. 3. Eligilbe candidates those who arealready in services should submit their application though proper channel. 4.All attested Xerox Copies of certifcates and other relevant Document should be attached to the application form.

**Address of Correspondence**
**Secretary**
**Jai Jawan Jai Kisan shikshan Prasrk Mandal Kandhar**
**Swami Ramanand Teerth College of Education (B.Ed) Kandhar**
**At Balantwadi Post.Ghodaj Tq.Kandhar Dist.Nanded**
**Pin code- 431714 (Maharashtra)**
**Mobile No 9529036074, 777406359**

## Change In Name

My Old Name is KRIMABEN SHAH which now I am changing as New Name KRIMA ANKUSH ADKATALWAR Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same. Address: C/o KRIMA ANKUSH ADKATALWAR H. No. 4-11-423 GOVERDHAN GHAT ROAD, DILIP SINGH COLONY, VAZIRABAD, NANDED-431601 Mo. 8388880188

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, श्रीमती नंदाबाई खुशालसिंघ ठाकूर यांचा सर्वे नं. ८०/अ मधील प्लॉट नं. ३ ज्याचे एकूण क्षेत्रफळ २४०० चौरस फुट (६० बाय ४०) असून, चतु:सिमा-पूर्वेस-प्लॉट नं. २९, पश्चिमेस-रोड, दक्षिणेस-रोड, उत्तरेस-प्लॉट नं. २ असून, हा प्लॉट इंदरजित कौर गुरुदयालसिंघ सपुरे व कांचन कौर प्रेमजितसिंघ लांगरी यांच्या नावे हस्तांतरण करण्यासाठी संस्थेकडे अर्ज केलेला आहे. तरी वरील प्लॉट बाबत कोणास काही आक्षेप, उजर, मालकी हक्क, देवाण-घेवाण, कुळ कर्ज, गहाण खत इत्यादी असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत संस्थेकडे लेखी कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा. मुदत संपल्यावर कोणाचाही आक्षेप स्वीकारल्या जाणार नाही करिता जाहीर प्रगटन.

**अध्यक्ष/सचिव**
**नंदीग्राम सहकारी गृहनिर्माण संस्था**
**मर्यादित नांदेड**

## जाहीर प्रगटन
## जय महाराष्ट्र शेती माल खरेदी विक्री सहकारी संस्था म. नांदेड ता. जि. नांदेड

या संस्थेच्या सर्व सभासद/मतदारांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची संचालक मंडळ निवडणूक सन २०२५ ते २०३० करीता निवडणूक कार्यक्रम दि. ३/७/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येत असून, उमदेवारी अर्ज दाखल करण्याचा कालावधी दि. ४/७/२०२५ ते १०/७/२०२५ आहे. प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी दि. ११/७/२०२५ रोजी करण्यात येणार असून, वैध नामनिर्देशन पत्राची यादी दिनांक १४/७/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार असून, उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिनांक २८/७/२०२५ असून, आवश्यकता असल्यास मतदान दिनांक १०/७/२०२५ रोजी उपनिबंधक सहकारी संस्था ता. नांदेड यांच्या कार्यालयात घेण्यात येणार असून, मतदान संपल्यानंतर लगेच मतमोजणी करण्यात येणार आहे. व निकाल जाहीर करण्यात येणार आहे. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**(एस. एस. झळके)**
निवडणूक निर्णय अधिकारी
जय महाराष्ट्र शेती माल खरेदी-विक्री
सहकारी संस्था, नांदेड

## नावात बदल

माझे पूर्वीचे नाव गोपाल बस्तीराम तिवाडी होते. यापुढे आता माझे नविन नाव बदलून राजगोपाल बस्तीराम तिवाडी असे राहील व याच नावाने ओळखले जाईल .यामुळे पुढील सर्व संपर्काचा व व्यवहाराचा कारभार नवीन नावानेच करण्यात येईल. सर्वांच्या माहितीस्तव.

**गोपाल बस्तीराम तिवाडी, डॉ. बजाज हॉस्पिटल, वजीराबाद, नांदेड. मो. ९८९०६३१०६९.**

## Change In Name

My Old Name is GOREE BEGUM SYED FARAD which now I am changing as New Name GOREE BEGUM Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.

Address: H.N.799, NEAR SANA HIGH SCHOOL, NOMANIYA NAGAR, TARODA Bk. NANDED MO.8983378931

## Change In Name

My Old Name is SHAIKH AY0B SHAIKH YUSUPH which now I am changing as New Name SHAIKH AYUB SHAIKH YUSUF Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.

Address: PORNIMA NAGAR TARODA Bk. NANDED MO. 9689038634

## Change In Name

My Old Name is SYED FARAD SYED CHAND which now I am changing as New Name SYED FARAD Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.

Address: H.N.799, STREET 3 NOMANIYA NAGAR NEAR SANA SCHOOL, NANDED MO.8983378931



स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# स्वच्छतेसोबतच पर्यावरणाच्या संतुलनासाठी वृक्षारोपण काळाची गरज -स्वच्छता दूत साईनाथ महाराज वसमतकर

**अर्धापूर (प्रतिनिधी)** – गाव स्वच्छ व सुंदर असले की आरोग्य चांगले राहते. तसेच पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी गावकऱ्यांनी वृक्षारोपण मोहीम राबविणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन स्वच्छता दूत साईनाथ महाराज वसमतकर यांनी केले आहे.

चेनापूर येथे स्वच्छता अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास महाराष्ट्र शासनाचे स्वच्छता दूत साईनाथ महाराज वसमतकर प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यावेळी ते बोलत होते. सरपंच सौ. भागरथाबाई महागाडे, विस्तार अधिकारी आरोग्य सुभाष कल्याणकर, ग्रामसेवक संतोष घूगे, तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष बालाजीराव राठोड, उपसरपंच दिलीप लोणे, उत्तम महागाडे, पोलीस पाटील अंबादास हलगिरे, माजी



सरपंच बालाजीराव जंगिलवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमात राज्याचे स्वच्छता दूत म्हणून निवड झालेले साईनाथ महाराज वसमतकर यांचा गावकऱ्यांच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी बोलतांना स्वच्छता दूत साईनाथ महाराज वसमतकर म्हणाले की, आपल्या गावाचे नाव लौकीक करण्यासाठी स्वच्छता अभियान राबविणे व गावकऱ्यांनी कोणत्याही कार्यक्रम सुरू होण्याअगोदर पर्यावरण संतुलीत ठेवण्यासाठी वृक्षारोपण करूनच कार्यक्रम करावा. त्यासाठी गावकऱ्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी पंचायत समितीचे अधिकारी राजेश जाधव, व्हाईस मिडियाचे तालुकाध्यक्ष गोविंद टेकाळे, पत्रकार सखाराम क्षीरसागर यांनीही मनोगत व्यक्त केले. हा स्वच्छता अभियान यशस्वी करण्यासाठी अंबादास बेराडे, पोतना जंगिलवाड, रामजी महागाडे, बालाजी मलू जंगिलवाड, नागोराव खुपसे, बालाजी पूयड, गजानन मुल्लेवाड, तानाजी सोळंके यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला गावातील महिला, युवती, विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात १० जुलै रोजी 'कॅम्पस् ड्राइव्ह'चे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** – स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील प्रशिक्षण व प्लेसमेंट विभाग आणि आय.बी.एफ. कौशल्य अकादमी (बँकेचे अधिकृत भरती व प्रशिक्षण भागीदार) यांच्या संयुक्त विद्यमाने प्रशासकीय इमारतीतील प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागात (कक्ष क्र.११४) 'कॅम्पस् ड्राइव्ह'चे दि.१० जुलै रोजी सकाळी ११ वाजता आयोजन करण्यात आले आहे.

या ड्राइव्हद्वारे विद्यार्थ्यांना थेट ॲक्सिस बँकेच्या वेतनाधिष्ठित नोकरीसाठी संधी उपलब्ध होणार आहे. ॲक्सिस बँकेच्या विक्री विभागामध्ये 'बिझनेस डेव्हलपमेंट एक्झिक्युटिव्ह' या पदावर वार्षिक रुपये २.२० लाख ते २.४० लाख अधिक ६० हजार रुपयांपर्यंत आकर्षक प्रोत्साहनपर भत्ता मिळणार आहे. या पदाकरिता कोणत्याही शाखेतील पदवीधर विद्यार्थी पात्र असून वयो मर्यादा २१ ते २७ वर्षे असणार आहे. ५० पेक्षा अधिक पदसंख्या असून नांदेड, लातूर, नाशिक, सोलापूर, नागपूर, चंद्रपूर, धुळे, पुणे, मुंबई व गोवा या ठिकाणी



नोकरी करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

कॅम्पस् ड्राइव्हबाबतच्या अधिक माहितीसाठी आय.बी.एफ. कौशल्य अकादमीचे शाखा प्रमुख अमर गोडबोले (९९६७९१५१११) आणि विद्यापीठाचे प्लेसमेंट अधिकारी डॉ. बालाजी मुधोळकर (९०२१८२५१३१) यांच्याशी संपर्क साधावा. या कॅम्पस् ड्राइव्हद्वारे पदवीधर विद्यार्थ्यांना एक प्रतिष्ठित बँकिंग संस्थेत नोकरीची उत्तम संधी उपलब्ध होत आहे. विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे.

# माहूर पोलिसांची जुगार अड्ड्यावर धाड; ११ जणांवर गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)**– माहूर शहरातील पारवेकर नगरातील जुगार अड्ड्यावर पोलिसांनी धाड टाकून ११ जुगाऱ्यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून जुगाराचे साहित्य व नगदी रक्कम असा २६ हजार २७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

माहूर ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी १ जुलै रोजी दुपारी तीन वाजताच्या सुमारास माहूर शहरात आबासाहेब पारवेकर नगरात धाज टाकली. यात मटका जुगार खेळणाऱ्या गोविंद पवार, जयानंद कांबळे, श्रीकांत पोटेकर, परमेश्वर पतंगे, गजानन रनबाळे, समशेर बेग समशेर जमाल, दिलीप पवार, आत्माराम राठोड, वसंत राठोड, बाबाराव छापेकर, राजू जाधव यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून नगदी रक्कम व जुगाराचे साहित्य असा २६ हजार २७० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी अंमलदार ज्ञानोबा खंदाडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून माहूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# सीईओ कावली यांच्या हस्ते जीपीएफ विवरण पत्र संगणकीकरणाचे लोकार्पण

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षकांचे सन २०२४-२५ चे भविष्य निर्वाह निधी (जीपीएफ) विवरणपत्र संगणकीकरण करण्यात आले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या हस्ते या संगणकीकरणाचे लोकार्पण करण्यात आले.



या प्रणालीव्दारे जीपीएफ विवरणपत्रे zpngpf.in या संकेतस्थळावर उपलब्ध होणार आहेत. शिक्षकांनी आपला आधार लिंक असलेला मोबाईल नंबर आधी नोंदवून, प्रवर्ग व GPF क्रमांक टाकल्यानंतर ओटीपी प्राप्त करून विवरणपत्र प्राप्त करू शकतील. या विवरणपत्रांना बारकोडसह पीडीएफ स्वरूपात प्रणालीवर पाहता आणि डाऊनलोड करता येणार आहे.

या डिजिटल पायाभरणीबद्दल समाधान व्यक्त करत मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी वित्त विभागाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी शिवप्रकाश चन्ना, लेखाधिकारी विशाल हिवरे तसेच सर्व संबंधित कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

या लोकार्पण प्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे आणि विविध विभागप्रमुख उपस्थित होते. शिक्षक संघटनांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत वित्त विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांचे आभार मानले आहेत.

# ११ वी ऑफलाईन प्रवेश प्रक्रियेची पर्यायी व्यवस्था करावी -आ. जितेश अंतापूरकर

**शंकरनगर (प्रतिनिधी)** – ११ वीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत तांत्रिक अडचणींमुळे ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत आहेत. संबंधित विभागाच्या अनागोंदी नियोजनामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य शिक्षणापासून दूर राहण्याची दाट शक्यता आहे. या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देत सरकारने तात्काळ ऑफलाइन प्रवेश प्रक्रियेचा पर्याय खुला करावा, अशी मागणी देगलूर-बिलोलीचे आमदार जितेश अंतापूरकर यांनी पावसाळी अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी केली आहे.



आ. अंतापूरकर यांनी सभागृहात स्पष्ट केले की, देगलुर बिलोली मतदारसंघातील दहावी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थीची टक्केवारी लक्षणीय आहे. अनेक विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेता येत नाही. पोलिटेक्निक, आयटीआय, नर्सिंग, शेती शाखांतील पदविका अभ्यासक्रम पूर्ण करूनही रोजगार मिळत नसल्याने विद्यार्थी आता पारंपरिक कला, वाणिज्य व विज्ञान शाखांत पदवी शिक्षणाकडे वळत आहेत. परंतु ११ वीच्या प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज करताना वेबसाईट स्लो होणे, अनेक वेळा क्रॅश होणे, तसेच विहित कालमर्यादा ओलांडणे या तांत्रिक अडचणी समोर येत आहेत.

ग्रामीण भागात अद्यापही दर्जेदार इंटरनेट सेवा नाही, विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रक्रिया समजत नाही आणि संगणकीय कौशल्याचा अभाव आहे. अशा स्थितीत शासनाने ग्रामीण भागात किमान ऑफलाइन प्रवेश प्रक्रियेस परवानगी द्यावी, अशी मागणी करत आ. जितेश अंतापूरकर यांनी शासनाने तात्काळ निर्णय घेऊन विद्यार्थ्यांचे नुकसान थांबवावे, अशी मागणी केली आहे.



**नांदेड** – येथील बालरोग तज्ज्ञ डॉ. हंसराज वैद्य यांना नांदेड भूषण क्रिडा संघटक पुरस्काराने सन्मानित करतांना माजी आमदार भाजपा महानगर अध्यक्ष अमर राजूरकर. यावेळी नांदेड दक्षिणचे आमदार आनंद बोंढारकर व आजी-माजी जिल्हा क्रिडा अधिकारी व इतर मान्यवर दिसत आहेत.

# तलवार बाळगणाऱ्या दोघांना अटक; तलवार व दुचाकी जप्त

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने मंगळवारी दुचाकीवर तलवारीने दहशत माजविणाऱ्या दोघांना वाजेगाव बायपास ब्रिजजवळ अटक केली आहे. त्यांच्याकडून एका तलवारीसह दुचाकी जप्त केली आहे.

नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकातील पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मटवाड व त्यांच्या टीमने पेट्रोलींग करीत असताना गोपनीय माहितीच्या आधारे मुदखेड रस्त्यावर वाजेगाव बायबास ब्रिजखाली दुचाकीवर असलेल्या दोघांना मंगळवारी दि. १ रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास तलवारीसह अटक केली. त्यांच्यावर मुदखेड पोलीस स्टेशनमध्ये खून, खुनाचा प्रयत्न अशा प्रकारचे गंभीर गुन्हे नोंद आहेत. सध्या ते जामीनावर असून ते कोणता तरी गंभीर गुन्हा करण्याच्या तयारीत असतांना त्यांना अटक करण्यात आली आहे. अंमलदार संतोष पवार यांच्या तक्रारीवरून ग्रामीण स्टेशनला दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मटवाड, पोहेकॉ केंद्रे, पचलींग, पोकॉ पवार, कल्याणकर, आवळे यांनी या कारवाईत सहभाग घेतला. पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी या कामगिरीबद्दल गुन्हे शाखेचे कौतूक केले आहे.

# रामभाऊ पवार यांचे निधन

**लोहा (प्रतिनिधी)**– पारडी येथील ज्येष्ठ नागरिक रामभाऊ बापुराव पवार (वय ७०) यांचे १ जुलै रोजी सायंकाळी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दि. २ जुलै रोजी दुपारी १२ वाजता पारडी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. बबन पवार व कैलास पवार यांचे दिवंगत रामभाऊ पवार हे वडील होत.



# माऊली 'प्रति पंढरपूर' शोभायात्रेचे शहरात रविवारी आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** – पंढरपूरला प्रत्यक्ष जाणे शक्य नसलेल्या भाविकांसाठी छोटासा अध्यात्मिक आनंद देण्यासाठी दरवर्षीप्रमाणे यंदाही हजारो भाविकांचा सहभाग अपेक्षित असलेली माऊली दिंडी 'प्रति पंढरपूर' शोभायात्रेचे ६ जुलै रोजी आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती दिंडीचे मुख्य संयोजक डॉ. रमेश नारलावार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

संत नामदेव मंदिर (गायत्री मंदिराजवळ), जुना मोंढा येथून या दिंडीची ६ जुलै रोजी दुपारी २ वाजता सुरुवात होणार आहे. दिंडीचे यंदाचे हे चौथे वर्ष आहे. जुना मोंढा टॉवर, बालाजी मंदिर, पंचवटी हनुमान मंदिर, मुथा चौक वजिराबाद, एस. पी. ऑफिस चौक, कालामंदिर स्वामी समर्थ मंदिर येथे शोभा यात्रेची सांगता होणार आहे, असे डॉ. नारलावार यांनी सांगितले. शोभायात्रेत माऊलींचा जीवंत देखावा, लेझीम पथक, टाळकरी संच, झाशीच्या राणीचा देखावा, ड्रेस कोडमधील भजनी महिला मंडळ, शौर्य पथक सादर करणारे बाल कलाकार हे प्रमुख आकर्षण असणार आहे.

# नांदेड तालुक्यातील निम्म्याहून अधिक ग्रामपंचायतीवर महिलाराज

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड तालुक्यातील ७३ ग्रामपंचायतीच्या सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी सरपंच पदाची आरक्षण सोडत मंगळवार दि. १ जूलै रोजी तहसील कार्यालयात जिल्हाधिकारी राहूल कर्डिले, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, सामान्य उपविभागीय अधिकारी अजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शांततेत पार पडली. तालुक्यातील ७३ ग्रामपंचायतीपैकी ३७ ग्रामपंचायतीवर महिलांना सरपंच पदाची संधी उपलब्ध होणार आहे.

अनुसूचित जातीसाठी तालुक्यात असलेल्या १८ ग्रामपंचायतीपैकी राहेगाव, मार्कंड, पोखर्णी, खुपसरवाडी, कोटतीर्थ, धानोरा, पिंपरी महिपाल, नाळेश्वर, जैतापूर या ठिकाणी सरपंच पदाचे आरक्षण राखीव ठेवण्यात आले आहे. गाडेगाव, बाभूळगाव, पुयणी, नागापूर / सस्तापूर, किकि, वाजेगाव, सुगाव बु. भनगी, बळीरामपूर



येथे अनुसूचित जाती महिलांसाठी सरपंच पदाचे आरक्षण राखीव आहे. तर अनुसूचित जमातीसाठी असलेल्या गोपाळचावडी ही ग्रामपंचायत सुध्दा महिलांसाठी राखीव आहे. नागरिकांचा मागास प्रवर्गातील २० पैकी चिखली बु. वडवना / खडकी, निळा, खडकूत एमशेटवाडी, वडगाव, आलेगाव, कामठा खुर्द, सुगाव खुर्द, गंगाबेट, लिंबगाव आदी ठिकाणी सरपंच पदाचे आरक्षण राखीव ठेवण्यात आले आहे. तर महिलांसाठी नेरली, फत्तेपूर इलिचपूर सिध्दनाथ धनेगाव/मुजामपेठ, पिंपळगाव नि. बोंढार ने, वानेगाव-वरखेड-भानपूर, पांगरी, कासारखेडा, वाडी बू. येथे नागरिकांचा मागास प्रवर्गातून सरपंच पदाचे आरक्षण महिलांसाठी राखीव आहे.

खुल्या प्रवर्गातील ३४ पैकी नांदुसा / भालकी, इंजगाव, विष्णुपूरी, एकदरा, ब्राम्हणवाडा, चिखली खू, तळणी, गुंडेगाव, थुगाव, खुरगाव, भायेगाव, पासदगाव/तर्फे काकांडी, दर्यापूर, सायाळ, वाहेगाव, पिंपळगाव, मिश्री, बोरगाव तेलंग येथे सरपंच पदाचे आरक्षण राखीव ठेवण्यात आले आहे. तर महिलांसाठी मरळक बु. मरळक खूर्द, वांगी/वाडी / वाडी करडेल, चिमेगाव, ढोकी, त्रिकुट/ वाडी झांजी, कल्लाळ, सोमेश्वर, रहाटी बु, बोंढार तर्फे ७३ ग्रामपंचायतीपैकी १८ जागा अनुसूचित जातीसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. त्यात ९ जागा महिलांसाठी राखीव आहेत. अनुसूचित जमातीसाठी १ जागा असून ती महिलांसाठी राखीव ठेवण्यात आली आहे. नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी २० जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. त्यापैकी १० जागा महिलांसाठी राखीव आहेत, तर खुल्या प्रवर्गासाठी एकुण ३४ जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत, त्यापैकी १७ जागा महिलांसाठी राखीव आहेत.

हवेली, तुप्पा, वाडी पुयड, पुणेगाव, काकांडी उर्फ तुप्पा, वाघी, धनगरवाडी, नसरतपूर/हस्तापूर, पिंपळगाव कोरका आदी ग्रामपंचायतीवर खुला प्रवर्ग महिला सरपंच पदासाठी आरक्षण राखीव ठेवण्यात आले आहे, अशी माहिती तहसीलदार संजय वारकड यांनी दिली आहे.

यावेळी निवडणूक नायब तहसीलदार नितेशकुमार बोलेलू निवासी नायब तहसीलदार स्वप्नील दिग्गलवार, इंद्रजित गरडकर, महसूल अधिकारी देविदास जाधव आदींसह विविध गावातील सरपंच, जि. प. सदस्य, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठा सेवा संघाचे भोपाळ येथे २६, २७ जुलै रोजी कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर

**नांदेड (प्रतिनिधी)**– मराठा सेवा संघाचे संस्थापक, इंजि. पुरुषोत्तम खेडेकर, राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार, महासचिव प्रदिप पाटील, राष्ट्रीय कार्याध्यक्ष सुनील महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २६ व २७ जुलै दरम्यान मध्यप्रदेशातील भोपाळ येथे कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. भोपाळ शहरात शामला हिल्स, पॉलिटेक्निक चौक स्थित हिंदी न्यास भवन येथे दोन दिवसीय निवासी कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर होत आहे.

या शिबिरासाठी महाराष्ट्र, मध्यप्रदेश, छत्तीसगड, गुजरात, राजस्थान, इत्यादी मध्यभारत विभागाच्या राज्यातून निवडक शंभर पदाधिकाऱ्यांचा प्रवेश निश्चित करण्यात येणार आहे.

या शिबिरात स्किल ट्रेनर शिवाजीराजे पाटील बाभळीकर, जिजाऊ ब्रिगेडच्या राष्ट्रीय अध्यक्ष डॉ निर्मला पाटील, सोपानमामा क्षीरसागर, मराठा सेवा संघाचे प्रशिक्षक प्रा. संभाजी नवघरे हे मार्गदर्शन करणार आहेत.

या शिबिराला सहकार कक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कापसे, जेष्ठ मार्गदर्शक प्रमोद महाजन, अशोक पवार, देवेंद्रराव वशिंग, अनंतराव निकम, भाऊसाहेब पवार, गणेश पाटील, परशुराम साळुंके, मल्हारराव चव्हाण, हेमंतराव मराठा, मध्यप्रदेशचे दानवीर राज्यअध्यक्ष तथा सुप्रसिध्द उद्योगपती आर एस पाटील, केडरबेस लिडर तथा राष्ट्रीय उपाध्यक्ष रविंद्र दाणी, छत्तीसगढ प्रदेश अध्यक्ष राजेश सावळे, प्रकाश कोचुरकर, डॉ एन पी कनाटे, राजेश पाटील, जिजाऊ ब्रिगेड अध्यक्ष शर्मिला पाटील, उमेश पाटील, प्रीति रोकडे, दीपक वाबळे, विकास मराठे, अनिल मांडावकर, अनिल पाटील, दिगंबर महाजन, डॉ मुकेश शिंदे, दिनेश चौधरी, सूर्यकांत ससाने, हरिभाऊ सोनवणे, मनीषा पाटील, कोमल देशमुख, धिरज महाजन, युवा नेत्या पुजा हुले यांची उपस्थिती राहणार आहे.

नांदेड जिल्ह्यातून संत गाडगेबाबा प्रबोधन कक्षाचे राष्ट्रीय महासचिव इंजि निलेश सुर्यवंशी, स्नेहा सुर्यवंशी, पोलिस पाटील आनंदराव माने, इत्यादी पदाधिकारी झील की नगरी भोपाळला रवाना होणार आहेत. या ऐतिहासिक प्रशिक्षण शिबीरात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या पदाधिकाऱ्यांनी प्रशिक्षण व निवास सुविधेसाठी पुर्वनोंदणी करण्याचे आवाहन विश्वप्रसिध्द माईंड पॉवर ट्रेनर शिवाजीराजे पाटील यांनी केले आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com